रविवार, १५ जानेवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १७८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

आपटा येथे जुगार खेळणाऱ्या १० जणांवर गुन्हा दाखल/२
पेणजवळ रेल्वे रूळाला तडा; कर्मचाऱ्याची सतर्कता/५
रिले स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील मुलींचे यश/८

# शिवराज राक्षे ‘महाराष्ट्र केसरी’

## महेंद्र गायकवाडला चितपट करीत पटकावली मानाची गदा





**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात आयोजित ६५व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या अंतिम सामन्याचा थरार शनिवारी (दि. १४) रंगला. ‘महाराष्ट्र केसरी’ची मानाची गदा पटकाविण्यासाठी महेंद्र गायकवाड विरुद्ध शिवराज राक्षे यांच्यात लढत झाली. यामध्ये शिवराज हा महेंद्रला चितपट करून विजयी झाला.

नांदेडचा शिवराज राक्षे आणि सोलापूरचा महेंद्र गायकवाड यांच्यात झालेल्या लढतीमध्ये शिवराजने एका मिनिटात महेंद्राला अस्मान दाखवत ‘महाराष्ट्र केसरी’च्या मानाच्या गदेवर नाव कोरले. शिवराजने माजी विजेत्या हर्षवर्धनला ८-१ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती, तर महेंद्रने वाशिमच्या सिकंदर शेखचा ६-४ असा पराभव केला होता.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अखिल भारतीय कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष खासदार ब्रिजभूषण सिंग, मंत्री चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शिवराज राक्षेला ‘महाराष्ट्र केसरी’ची मानाची गदा, महिंद्रा थार जीप आणि पाच लाख रुपये देऊन गौरविण्यात आले.

विशेष म्हणजे दोन्ही मल्ल हे पुण्याच्या तालमीतच तयार झाले आहेत. वस्ताद काका पवार आणि गोविंद पवार यांच्या कात्रज येथील आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल तालमीत दोघांनी कुस्तीचे धडे गिरवले आहेत. वस्ताद काका पवार यांच्या शिष्याने यंदा ‘महाराष्ट्र केसरी’ होण्याचा मान मिळविला.

### कोकण शिक्षक मतदारसंघ निवडणूक

# ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाचा निर्धार

## रोह्यात महायुतीची आढावा बैठक; प्रमुख नेते, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती



(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ रायगड जिल्ह्यातील प्रमुख नेते, पदाधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक शनिवारी (दि. १४) रोह्यात आयोजित करण्यात आली होती. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

धाटाव एमआयडीसीतील आरआयआरसी हॉलमध्ये झालेल्या बैठकीस बाळासाहेबांच्या शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, भाजप नेते ॲड. महेश मोहिते, प्रदेश सरचिटणीस रवी मुंढे, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, वैकुंठ पाटील, सरचिटणीस अविनाश कोळी, मिलिंद पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष हेमा मानकर, पेणच्या माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, भाजप रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांभेकर, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे, उपतालुकाप्रमुख संदेश मोरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करून महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीनंतर भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, रायगड जिल्ह्यात एकूण १०,१२३ इतके शिक्षक मतदार आहेत. त्या सर्वांपर्यंत पोहचण्यासाठी जिल्ह्यातील महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व सहकाऱ्यांनी सर्व शिक्षक मतदारांना या निवडणुकीत योग्य उमेदवारास मतदान करण्याचे आवाहन करावे. महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी त्यांच्या संघटनेच्या माध्यमातून शिक्षकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलाय. त्यामुळे या निवडणुकीत म्हात्रे सर विजय संपादित करतील, असा विश्वास आहे. (पान २ वर..)

# खांदा कॉलनीतील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

### केंद्रीय मंत्री भागवत कराड, भाजप नेत्या पंकजा मुंडे यांची भेट



(छाया : योगेश पाटील)



(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री संत वामनभाऊ व भगवानबाबा पुण्यतिथीनिमित्त खांदा कॉलनीत अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहाला शुक्रवारी (दि. १३) केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांनी भेट दिली. सप्ताहाची सांगता शनिवारी (दि. १४) ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. अखेरच्या दिवशी भाजपच्या राष्ट्रीय सचिव, माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी सप्ताहाला भेट दिली.

खांदा कॉलनीतील पोलीस ठाण्यासमोरील मैदानात ७ ते १४ जानेवारीदरम्यान हरिनाम सप्ताह रंगला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले. या सप्ताहाला शुक्रवारी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांनी भेट देत वंदन केले. या वेळी त्यांनी श्री संत वामनभाऊ, भगवानबाबा आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या आशीर्वादामुळे मी जनतेची सेवा करीत आहे. जनतेसोबत असलेली नाळ तुटू देणार नाही, ग्वाही दिली, तर सप्ताहाला अखेरच्या दिवशी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी भेट दिली व वंदन केले. आयोजकांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, सरचिटणीस विक्रांत पाटील, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, तहसीलदार विजय तळेकर, माजी उपमहापौर सीताताई पाटील, (पान २ वर..)

## पुणे हादरले! एकाच कुटुंबातील चौघांची आत्महत्या

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील मुंढवा परिसरात राहणाऱ्या एकाच कुटुंबातील चार जणांनी विषारी द्रव्य पिऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १३) रात्री घडली. यामध्ये पती-पत्नी आणि दोन मुलांचा समावेश आहे. आर्थिक कारणावरून त्यांणी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

आत्महत्या केलेल्या कुटुंबीयांच्या घराचा दरवाजा बंद असल्याने जवळच राहणाऱ्यांना संशय आला होता. याबाबत त्यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर सर्व प्रकार उघड झाला.

## राष्ट्रवादीच्या खासदाराचे सदस्यत्व रद्द

### हल्लाप्रकरणी मोहम्मद फैजल यांच्यावर कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राष्ट्रवादी काँग्रेसचे लक्षद्वीप येथील खासदार मोहम्मद फैजल यांचे लोकसभेतील सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. फैजल यांना एका प्रकरणात १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले असल्याची माहिती लोकसभा सचिवालयाकडून देण्यात आली. राष्ट्रवादीला हा मोठा धक्का आहे.

२००९ साली लोकसभा निवडणुकीत प्रचारादरम्यान काँग्रेसचे नेते पी. एम. सईद यांचे जावई आणि काँग्रेस नेते मोहम्मद सालेह यांच्यावर हल्ला झाला होता. या हल्ल्यात जखमी झालेल्या सालेह यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सालेह यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणात फैजल यांनी मदत केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात लक्षद्वीपमधील कवरत्ती जिल्हा आणि सत्र न्यायालयाने खासदार फैजल यांच्यासह अन्य तीन जणांना तुरुंगवासाची शिक्षा सुनावली तसेच चौघांनाही एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. त्यामुळे फैजल यांची खासदारकी रद्द करण्यात आली आहे.

## निवडक

### राहुल गांधींच्या यात्रेदरम्यान पंजाबमधील खासदाराचा मृत्यू

**जालंधर** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासोबत भारत जोडो यात्रेत चालत असताना शनिवारी (दि. १४) पंजाबमधील जालंधरचे खासदार संतोखसिंग चौधरी (वय ७७) यांचा मृत्यू झाला. फिल्लोर येथे यात्रेत अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना जीवे मारण्याची धमकी

**नागपूर** : भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी आली आहे. नागपूर येथील त्यांच्या कार्यालयात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या नावे खंडणीसाठी धमकीचा फोन आला होता. यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून ना. गडकरी यांचे निवासस्थान आणि जनसंपर्क कार्यालयाजवळ पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला आहे.

## पोलादपुरातील उपोषणाची यशस्वी सांगता



**पोलादपूर : तालुक्यातील दिविल ग्रामपंचायत निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान जाहीर झालेला निकाल बदलण्याच्या कृतीविरोधात भाजप उमेदवारांचे प्रतिनिधी विश्वास नलावडे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. आमदार प्रवीण दरेकर यांनी मध्यस्थी करीत उपोषणाची शनिवारी यशस्वी सांगता केली. वृत्त पान ५ वर..** (छाया : शैलेश पालकर)




## रायगडचा पारा घसरला; माथेरानचे तापमान ११.६ अंश

**अलिबाग : प्रतिनिधी**

गुलाबी थंडीची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना गेल्या काही दिवसांत थंड वातावरणाचा व दाट धुक्याचा अनुभव येऊ लागला आहे. काही भागात तर सकाळी ९ वाजले तरी धुक्याची चादर पहायला मिळते. माथेरानमध्ये शनिवारी (दि. १४) या मोसमातील सर्वांत कमी म्हणजे ११.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दरम्यान, थंडीमुळे ठिकठिकाणी शेकोटीचा आनंद नागरिक घेताना दिसत आहेत.

या वर्षीही लांबलेल्या पावसाने ऋतूचक्रावर परिणाम होऊन थंडी व धुके गायब झाले होते. नोव्हेंबर महिन्यात थंडी अनुभवायला मिळाली नाही. थंडीचा हंगाम लांबत गेला. डिसेंबर महिन्यात कधी थंडी, तर कधी ढगाळ वातावरण होते. जानेवारी सुरू झाला तशी थंडीची चाहूल लागली असून वातावरणात बदल होऊन सकाळी दाट धुके व थंडी जाणवत आहे.

थंडीमुळे जिल्ह्यात आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. हे वातावरण रब्बी पिकांना पोषक असून कडधान्य पिकाला याचा चांगला फायदा होईल, तर आंब्याचा मोहर येण्यासही या वातावरणामुळे मदत होणार आहे.

## पोलिसांनी नोंदविला उर्फी जावेदचा जबाब

**मुंबई : प्रतिनिधी**

चित्रविचित्र कपड्यांमुळे नेहमीच चर्चेत असणारी अभिनेत्री व मॉडेल उर्फी जावेद हिने शनिवारी (दि. १४) आंबोली पोलीस ठाण्यात हजर होत आपला जबाब नोंदविला. आता उर्फीसंदर्भात पोलीस काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

सार्वजनिक ठिकाणी अंगप्रदर्शन केल्याने उर्फीविरोधात भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी पोलिसांत तक्रार केली होती. त्यानुसार पोलिसांनी उर्फीला नोटीस बजावली होती. उर्फी ही तोकड्या कपड्यांमध्ये फिरून नग्नता व अश्लीलतेचा प्रचार करीत असल्याचा वाघ यांचा आरोप आहे.



## निवडक



### उरण महाविद्यालयात फूड फेस्टिव्हल

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अजिवन अध्ययण व निरंतर षिक्षण विभागाच्यावतीने अन्नपूर्णा योजनेंतर्गत फुड फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आहे. प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या हस्ते या फुड फेस्टिव्हलचे उद्घाटन करण्यात आले. रमेश ठाकूर, के. ए. शामा, डि.एल.एल. ई. विभाग प्रमुख प्रा. व्हि. एस. इंदूलकर, निलेश पाटील मान्यवरांच्या उपस्थित हा फेस्टीव्हल साजरा केला गेला. विद्यार्थ्यांनी लस्सी, साबुदाना खिचडी, कटलेल्स, चायनिज, न्युडल्स, कोलडिक्स, ज्युस इत्यादी पदार्थ तयार करून विकले व व्यावसायिक अनुभव घेतला. प्रा. रियाज पठाण, प्रा. हन्नत षेख, प्रा. मेघा रेकृी यांनी या फेस्टीव्हलच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

### वेश्या व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** बेकायदेशीररीत्या वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांविरोधात तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे. तालुक्यातील तळोजा फेज २ येथील एका इमारतीमध्ये बेकायदेशीररित्या इमारतीमध्ये वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे यांना मिळाली. त्यांच्या विशेष पथकाने छापा टाकून काही महिलांसह मोबाईल फोन, रोख रक्कम व इतर ऐवज असा हस्तगत करून या महिलांविरोधात भा. दं. वी. कलम ३७० (३)सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्व्ये कारवाई केली आहे.

### बेलापूर येथे विविध स्पर्धा

**नवी मुंबई :** श्री अंबिका योग कुटीर आणि मल्लखांब असोसिएशन नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मल्लखांब या खेळाच्या प्रसार व प्रचार या हेतुने नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर सेक्टर ९ येथे प्रथमच निमंत्रित नवोदित पुरलेला मल्लखांब, रोप मल्लखांब, जिम्नॅस्टिक्स (फ्लोअर एक्सरसाईज.), सुर्यनमस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेत नवी मुंबईतील ६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. रविवार (दि. १५) या स्पर्धेला सुरुवात होणार असून २२ तारखेपर्यंत ही स्पर्धा सुरू राहणार आहे. सकाळी ८.४५ वाजता या स्पर्धेचे उद्घाटन होणार असल्याचे स्पर्धेचे आयोजक बेलापूर येथील श्री अंबिका योग कुटीरचे संचालक रविंद्र जाधव, स्पर्धा प्रमुख लतेश पडवळ, नवी मुंबई मल्लखांब असोसिएशनचे मानद सचिव संजय रायचुरकर यांनी माहिती देताना सांगितले.

# राज्यात ड्रग्जविरोधात विशेष मोहीम राबविणार -देवेंद्र फडणवीस

## पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना दिली माहिती

**पुणे : वृत्तसंस्था**

ज्याप्रमाणे मधल्या काळात काही लोकांनी महाराष्ट्र पोलिसांच्या नावाला बट्टा लावला आहे. तो संपवावा लागेल आणि पोलीस खात्याला नावलौकिक पुन्हा मिळालं पाहिजे, यासाठी पोलिसांनी काम केलं पाहिजे. तसेच ड्रगच्या विरोधात एक विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहीती राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे येथे दिली. सिनियर पोलीस अधिकाऱ्यांची



क्राईम कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, यापूर्वी काही लोकांनी महाराष्ट्र पोलिसांचे नाव बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. पण पोलिस खात्याचे नावलौकिक पुन्हा मिळालं पाहिजे यासाठी पोलिसांनी काम केले पाहिजे अशा सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांना केल्या. पुण्यात सिनियर ऑफिसर यांची क्राईम कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी फडणवीसांनी माध्यमांशी संवाद साधला.

त्यावेळी ते म्हणाले, या कॉन्फरन्समध्ये वेगवेगळ्या विषयांवर प्रेझेंटेशन केले होते. यात वेगवेगळ्या घटकांमध्ये युनिटमध्ये गुन्ह्यांची परिस्थिती काय आहे. प्लॅनिंग काय आहे. याबाबत परमार्ष घेण्यात येतो. २०२२ वर्षात वेगवेगळ्या गुन्ह्यांबाबत आढावा घेण्यात आला आहे. यात कुठेकुठे वाढ आहे, कुठे कमतरता आहे यावर लक्ष दिलं. जिथे वाढ आहे त्यामागील कारण काय आहे. याबाबत चर्चा करण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### आपटा येथे जुगार खेळणाऱ्या १० जणांवर गुन्हा

**रसायनी : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील आपटा गावात स्मशानभूमीजवळील मोकळ्या शेडमध्ये जुगार खेळला जात असताना रसायनी पोलिसांनी



धाड टाकून मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी १० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपटा गावात बेकायदेशीररित्या पैसे लावून जुगार खेळला जात होता. रसायनी पोलीस ठाण्याच्या पथकाने तेथे धाड टाकली. या वेळी घटनास्थळावरून रोख रक्कम, रिक्षा, मोटरसायकल इत्यादी मिळून एक लाख ६७ हजार ९६० एवढा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी शब्बीर मोहम्मद सईद मुल्ला, हरिश जोमा सावंत, कुरेश शहाबुद्दीन सिद्धीकी, रमेश भाऊ सावंत, विजय मुकुंद भाटे, शंकर भिमराव राठोड, प्रदीप चिंतामण कांबळे, सचिन रमेश सनगरे, दत्ता पांडुरंग वाघे व जनार्दन जोमा सावंत यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

## सीबीडीत रंगणार नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव

### नवी मुंबईकरांना नववर्षात विविध कार्यक्रमांची मेजवानी

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे. २० ते २९ जानेवारी या कालावधीत सुनील गावस्कर मैदान, से-१, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई येथे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात सहभागी व्हा, असे आवाहन आ. मंदा म्हात्रे यांनी केले आहे.

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या वतीने गेली २७ वर्षे समाजपयोगी, शैक्षणिक, व सांस्कृतिक कार्यक्रम, नाटय, संगीत व विविध स्पर्धे चे आयोजन करण्यात येत आहेत. कार्यक्रमाचे उदघाटन शुक्रवार २० जानेवारी रोजी सायंकाळी ६ वा. करण्यात येत असून त्याच दिवशी महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आलेला आहे. शनिवार २१ जानेवारी रोजी आगरी कोळी पारंपारिक नृत्य व लावणी नृत्य यांचा सुवर्णसंगम असलेला सुंदर कार्यक्रम आयोजित केला असून रविवार २२ जानेवारी रोजी सुप्रसिद्ध लावणी सम्राज्ञींचा नयनरम्य कलाविष्कार लावणी महोत्सव होणार आहे. सोमवार २३ जानेवारी रोजी शालेय गटासाठी समूह नृत्य व वेशभूषा आंतरशालेय स्पर्धा होणार आहे.

मंगळवार २४ जानेवारी रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा व महिलांसाठी मेहंदी व पाककला स्पर्धेचे आयोजन तसेच पती-पत्नी जोडी साठी आम्ही दोघे राजा राणी या धमाल मनोरंजन कार्यक्रमही होणार आहे. बुधवार २५ जानेवारी रोजी संपूर्ण भारताच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारा कश्मीर से कन्याकुमारी हा मनमोहक नृत्यात्मक कार्यक्रम होणार असून भारताच्या प्रजासत्ताकदिनी गुरुवार २६ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री छत्रपती शाहू महाराज महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संगीतमय अभिवादन म्हणून वंदितो महामानवा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

२७ जानेवारी रोजी बेलापूर विधानसभा क्षेत्रातील खुल्या वर्गासाठी समुह नृत्य व वेशभूषा स्पर्धा आयोजित केली असून २८ जानेवारी रोजी जुन्या व नव्या गीतांचा कार्यक्रम कृष्णा देवा म्युझिकल नाईटचे आयोजन केले आहे. तसेच सायंकाळी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारा गीत संगीत आणि नित्याने समजलेला मराठी दौलत लाखाची या कार्यक्रमाने नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सवाची सांगता होणार आहे. सिबिडी-बेलापूर येथे १० दिवस कार्यक्रमांची मेजवानी नवी मुंबईकरांना मिळणार आहे.

## महाबळेश्वरमध्ये मजुरांना घेऊन जाणारा टेम्पो दरीत कोसळला



**सातारा : वृत्तसंस्था**

सिन्नर-शिर्डी मार्गावर पाथरे परिसरात शनिवारी (दि. १३) ट्रक आणि बसचा भीषण अपघात झाला होता. या अपघातामध्ये दहा जण ठार झाले तर अनेक जण गंभीर जखमी झाले होते. ही घटना ताजी असतानाच आता पुन्हा एकदा एक भीषण अपघात झाला आहे. मजुरांना घेऊन जाणारा टेम्पो दरीत कोसळला आहे. महाबळेश्वर जवळ हा अपघात घडला आहे. मुकदेव येथील कोठरोशी पुलाजवळ हा अपघात झाला आहे. या अपघातामध्ये जखमी झालेल्या मजुरांना उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, हा अपघात रविवारी (दि. १४) पहाटेच्या सुमारास झाला. अपघातग्रस्त टेम्पोमधून तीस मजूर प्रवास करत असल्याची माहिती समोर येत आहे. आज पहाटेच्या सुमारास महाबळेश्वरजवळ मुकदेव येथील कोठरोशी पुल परिसरात हा अपघात झाला आहे. टेम्पो दरीत कोसळून हा अपघात झाला. मात्र या अपघाताचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन बचाव कार्याला सुरुवात केली आहे. मजुरांना दरीतून बाहेर काढण्यात आलं असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

## कोटनाका मैदानावर गुरुवारपासून रंगणार उरण महोत्सव २०२३

**उरण : वार्ताहर**

उरण येथे महेश बालदी मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वूमन ऑफ विस्डम, स्टेप आर्ट कला क्रीडा, शैक्षणिक आणी सामाजिक संस्था उरण, स्टोर्म फिटनेस आणि मिक्स मार्शल आर्ट आयोजक असून यांनी उरण महोत्सव २०२३ चे आयोजन केले आहे. हा उरण महोत्सव कोटनाका मैदान पेट्रोल पंपाच्या मागे उरण येथे होणार आहे .

उरण महोत्सव १९ ते २२ जानेवारी सायंकाळी ६ ते रात्रीपर्यंत सुरु राहणार आहे. गुरुवार (दि.१९) रोजी सायंकाळी ७ वाजता उरणचे आमदार महेश बालदी भाजप जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उरण महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर सोलो डान्स स्पर्धा (एकेरी नृत्य स्पर्धा) होणार आहे.

शुक्रवार ( दि. २० ) जानेवारी रोजी स्टोर्म फिटनेस आणि मिक्स मार्शल आर्टचे संस्थापक अध्यक्ष सिद्धेश शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली शरीर सौष्ठव स्पर्धा घेण्यात येणार आहे. शनिवार (दि.२१) जानेवारी रोजी जल्लोष सुवर्ण युगाचा व सायंकाळी ७.३० वाजता सोनी मराठी चॅनेलवरील महाराष्ट्राची हास्य जत्रेतील फेम कलाकारंची उपस्थिती राहणार आहे. ८ किट्स (अंक)सादर करणार आहेत. रविवार (दि.२२) रोजी सायंकाळी ७ वाजता मराठी अभिनेत्री तथा नृत्यांगना मानसी नाईक उपस्थितीत राहणर आहेत. त्याचप्रमाणे समूह नृत्य स्पर्धा होणार आहे .

आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, स्टेप आर्ट कला क्रीडा, शैक्षणिक आणी सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष पप्पू सूर्यराव, वूमन ऑफ विस्डमचे संस्थापक अध्यक्ष सारिका पाटील, स्टोर्म फिटनेस आणि मिक्स मार्शल आर्ट चे संस्थापक अध्यक्ष सिद्धेश शिंदे यांचे सहकार्य मिळणार आहे. अधिक माहितीसाठी पप्पु सूर्यराव - ९८२१६२५३६२ , पंकज जाधव -७०२१५०४५७५, गणेश म्हात्रे -९८३३७८०७१५ यांच्याशी संपर्क साधावा असे आयोजकांनी सांगितले.

## माणगावात आढळला महिलेचा मृतदेह

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल गावच्या हद्दीत रायझिंग रेसिडींसीच्या पाठीमागील जंगल भागात एका अंदाजित ५० ते ५५ वर्षीय वयाच्या स्त्री जातीच्या अनोळखी महिलेचा मृतदेह सापडला. घटना शनिवार १४ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १० वाजण्याच्या पूर्वी घडली. याबाबत निलाबाई निलु चव्हाण (वय-४५) रा. दत्तनगर ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, घटनेतील मृत अनोळखी महिला (नाव,गाव माहीत नाही) ही कोणत्यातरी अज्ञात कारणामुळे माणगाव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल गावच्या हद्दीत रायझिंग रेसिडींसीच्या पाठीमागील जंगल भागात मृत स्थितीत आढळली. घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून दाखल करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्री.ओमले हे करीत आहेत.

## खालापुरात आपत्ती व्यवस्थापन शिबिराला प्रतिसाद

**खालापूर : प्रतिनिधी**

आपत्कालीन परिस्थितीत गोंधळून न जाता समय सूचकतेचा वापर करुन मदत कशी मिळवावी याबाबतचे मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक प्राध्यापक जयपाल पाटील यांनी खालापूर येथे करून दाखविले. उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व सुरक्षा दल रायगड अलिबाग यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे आयोजन खालापूर येथे करण्यात आले होते.



यावेळी जयपाल पाटील यांच्यासह खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी, पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, रसायनी पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर, अपघात ग्रस्त मदत पथकाचे गुरुनाथ साठेलकर यांच्यासह तालुक्यातील विविध स्तरावर काम करणाऱ्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आग, अपघातसह आपत्ती वेगवेगळ्या प्रकारच्या असते अशा परिस्थितीत पथक तयार करून आपण छोटी मोठी मदत करून सामाजिक जबाबदारी घेतली पाहिजे, असे प्राध्यापक जयपाल पाटील यांनी सांगितले.

आपत्ती काळात आवश्यक दामिनी प्रणाली, पोलीस ठाणे क्रमांक आपल्या मोबाईल मध्ये असणे आवश्यक आहे असे देखील पाटील यांनी सांगितले . ११२ नंबर वर संपर्क साधल्यानंतर कशाप्रकारे मदत होते याची सविस्तर माहिती शिबिरात देण्यात आली. सर्प किंवा विंचु दंश झाल्यानंतर शासकीय रुग्णालय गाठावे जेणेकरून त्या ठिकाणी उपचारासाठी आवश्यक औषधांचा साठा असतो याची माहिती प्राध्यापक पाटील यांनी दिली.

आगीसारखी दुर्घटना उद्भवल्यास गोंधळून न जाता आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करावा याचे प्रात्यक्षिक प्राध्यापक पाटील यांनी तहसील कार्यालयाच्या आवारात दाखविले .यावेळी अग्निशमन दलाला फोनवरून संपर्क केल्यानंतर अग्निशमन बंब किती वेळात घटनास्थळी हजर होतो हे देखील प्रात्यक्षिक असं दाखवण्यात आले. आपत्ती व्यवस्थापना शिबिराचा खूप फायदा झाला असून ज्ञानात भर पडल्याचे दिलासा फाउंडेशन महिला उत्थान प्रमुख भाग्यश्री शिंदे यांनी सांगितले.

पान १ वरून

### ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाचा निर्धार

मागच्या निवडणुकीत आम्ही वेगवेगळे लढलो, परंतु आताची परिस्थिती ही वेगळी आहे. आम्ही बाळासाहेबांची शिवसेना व भाजप सिंधुदुर्गपासून पालघरच्या टोकापर्यंत एकत्र येऊन लढत आहोत तसेच इतर सहकारी पक्ष आमच्यासोबत आहेत. शिक्षक मतदारही आम्हाला पाठिंबा देणार आहेत. त्यामुळे ज्ञानेश्वर म्हात्रे यांची ताकद निश्चित वाढलेली आहे, असे आमदार भरत गोगावले म्हणाले. आमदार रविशेठ पाटील यांनीही ज्ञानेश्वर म्हात्रे यांना विजयी करण्याचे आवाहन केले, तर उमेदवार म्हणून बोलताना ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी मला संधी द्यावी. शिक्षकांचे जे काही प्रश्न असतील ते मार्गी लावू, अशी ग्वाही दिली.

### खांदा कॉलनीतील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

भाजप भटके विमुक्त आघाडी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, मंडळाचे अध्यक्ष हरिदास वणवे, उपाध्यक्ष सुनील खाडे, विनायक मुंडे, सचिव देविदास खेडकर, खजिनदार संजय वायभासे, उपसचिव दिलीप नाकाडे, दत्ता बिनवडे, उपखजिनदार शिवाजी लांब, बाळासाहेब बडे, विष्णू वायभासे, किसन लांडगे, सल्लागार सदानंद पाटील, कचरू डमाळे, रामदास नाकाडे, सतीश गरजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## 'रोटरी'च्या रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटीचे पिल्लई एचओसी कॅम्पस रसायनी व रोटरी क्लब ऑफ पाताळगंगातर्फे आयोजित रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ९७ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. या शिबिराचे उद्घाटन पिल्लई कॅम्पसचे प्रमुख प्राचार्य डॉ. लता कस्तुरी मेनन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एमजीएम हॉस्पिटल व साई ब्लड बँकच्या सहकार्याने ९७ रक्तदान बाटल्यांचे संचयन करण्यात आले.




या वेळी रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष गणेश काळे व रोटरीयन प्रतीक्षा कुरंगले यांनी भरपूर सहकार्य केले. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष रोटरीयन अमित शाह यांनी धन्यवाद आणि आभार व्यक्त केले .

या कार्यक्रमाला रोटरी पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, सेक्रेटरी डॉ. धीरज जैन, रेश्मा कुरूप, माजी अध्यक्ष गणेश काळे, बाळकृष्ण होणावळे, गणेश म्हात्रे, सुनील कुरूप, ऋतुजा भोसले, शशिकांत शानबाग, मेघा कोरडे, सचिन थोरात, देवेंद्र महिंद्रीकर, उमा मुंढे, शारदा काळे, वर्षा पाटील, प्रतीक्षा कुरंगले, रंजना माथूर व अनुराधा होणावळे उपस्थित होत्या.

## नाईक महाविद्यालयात भूगोल दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ.जी. नाईक महाविद्यालय भूगोल विभाग अंतर्गत भूगोल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. भूगोल दिन १४ जानेवारी या निमित्ताने प्रासंगिक तीन दशके पूर्ण महाराष्ट्रातील विविध संस्था महाविद्यालय भूगोल दिन साजरा केला जातो.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन पूर्व प्राचार्य मिराज आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज तसेच फार्मर असोसिएट डिन नीट वर्ड सीनियर युनिव्हर्सिटी ,पुणे डॉ. माधुरी कुलकर्णी, एफ.जी नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. दत्तात्रय घोडके, भूगोल विषय शिक्षक प्राध्यापिका डॉ. कविता पवार तसेच शिक्षक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी भूगोल विषय प्राध्यापक या नात्याने विद्यार्थ्यांचे संवाद साधला व पर्यावरण स्नेह म्हणून सामाजिक बांधिलकी जपण्याचे सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी भूगोल दिनानिमित्त प्रश्नमंजुषा प्रतियोगिता आयोजित केली होती.

कला शाखा प्रमुख डॉ. दत्तात्रय घोडके यांनी भूगोल विषयाबद्दल माहिती तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पाऊल उचलने खूप महत्त्वाचे आहे याबद्दल माहिती सांगून भूगोल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. माधुरी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत भूगोल विषयाची माहिती सांगितली. त्याचबरोबर भूगोल विषय व इतर विषयाची सलग्न आहे याची माहिती दिली तसेच विविध सामाजिक प्रश्न संबंधी विद्यार्थ्यांची चर्चा करताना स्त्रीभ्रूणहत्या लोकसंख्या, वाढते प्रदूषण साक्षरता या विषयावर माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. कविता पवार यांनी केले व उपस्थितांचे आभार मानले.

### दुखवटा



### छबीबाई पाटील

**उरण :** उरण तालुक्यातील कोप्रोली येथील रहिवासी छबीबाई चंद्रेश्वर पाटील यांचे बुधवार (दि. ४) रोजी वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. छबीबाई या प्रेमळ स्वभावाच्या होत्या. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सुदेश पाटील यांच्या त्या आजी आहेत. छबीबाई यांना ५ मुले, ३ मुली, २४ नातवंडे आहेत. त्यांचा कुटुंब परिवार खूप मोठा आहे. छबीबाई यांचा दशक्रिया विधी शुक्रवार १३ जानेवारी रोजी उद्धर पाली येथे पार पडला. तर उत्तर कार्य विधी रविवार १५ जानेवारी रोजी राहत्या घरी कोप्रोली येथे होणार आहे.

# पनवेल, उरणमध्ये रस्ते सुरक्षा अभियान

## वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

रस्ता सुरक्षा अभियान २०२३ सर्वत्र राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पनवेल, नवी मुंबई, उरण यांसह विविध ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्यात



येत आहेत. त्याअंतर्गत पनवेल शहरातील पंचमुखी सिग्नल, नवीन पनवेल सिग्नल, एचडीएफसी सर्कल व खांदा वसाहत येथे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

रस्ते अपघात वाहतुकीचे नियम न पाळले गेल्याने अनेकांचे जीव गेल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे या सप्ताहामध्ये वाहनचालकांमध्ये वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत वाहतूक शाखेतर्फे पनवेल शहरातील पंचमुखी सिग्नल, नवीन पनवेल सिग्नल, एचडीएफसी सर्कल व खांदा वसाहत येथे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली. या मध्ये वाहनचालकांना सीट बेल्टचा वापर करणे, हेल्मेट वापरणे, मद्यपान करून गाडी न चालवणे यांसाख्या गोष्टी पथनाट्य आणि फलकांच्या माध्यमातून समजावण्यात आल्या.

या रस्ता सुरक्षा अभियान संदर्भात पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे व त्यांचे पथक त्याचप्रमाणे कळंबोली वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक भरत साळुंके व पोलीस उपनिरीक्षक मोहन मुळीक यांनी हेल्मेट वापरासंदर्भात अधिक माहिती देत वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावे, असे आवाहन केले.

## मोटरसायकल हेल्मेट रॅली

**उरण : प्रतिनिधी**

उरणमध्ये पनवेल प्रादेशिक परिवहन विभाग आणि येथील विविध मोटार ट्रेनिंग स्कूलच्या माध्यमातून



रस्ता सुरक्षा अभियान २०२३ अंतर्गत मोटरसायकल हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी अभय देशपांडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील, सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन ठोंबरे, सचिन विधाते, निलेश धोटे यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार वाहन निरीक्षक दिनेश बागुल, संजय पाटील तसेच सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांचे प्रमुख उपस्थितीत रस्ता सुरक्षा अभियान २०२३ अभियानांतर्गत आयोजित मोटरसायकल हेल्मेट रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

उरण केअर पॉईंट हॉस्पिटल ते एनएनएमटी स्टॉप, उरण असे मोटरसायकल हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी श्री एकविरा मोटार ट्रेनिंग स्कूलचे बळीराम ठाकूर, उरण मोटार ट्रेनिंग स्कूलचे दानिश मुकरी, हरि हरेश्वर मोटार ट्रेनिंग स्कूलचे जितेंद्र प्रधान, गणेश मोटार ट्रेनिंग स्कूलचे गणेश भोईर, श्री राघोबा मोटार ट्रेनिंग स्कूलचे प्रितम पाटील, वाहनचालक, नागरिक आदी उपस्थित होते.

# न्यायवृंदाच्या सहकार्याने वकील संघटनेची ध्येय्यपूर्ती -अॅड. भुजबळ

**पनवेल : प्रतिनिधी**

न्यायवृंदाने आवश्यक तेथे सहकार्याची भूमिका घेऊन वकील संघटनेची ध्येय्यपूर्ती करण्यासाठी पुढे यावे, अशी माफक अपेक्षा पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांनी न्यायवृंदातर्फे शुक्रवारी (दि. १३) आयोजित पनवेल वकील संघटना नवनिर्वाचित कार्यकारिणीचा परिचय व सत्कारावेळी व्यक्त केली.



पनवेल येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जयराज वडने, भाकरे साहेब, अमोल शिंदे, पलडेवार तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर गुन्नाल साहेब, मुजावर साहेब, सोनावणे साहेब, गोडसे मॅडम, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पांडे साहेब, सोनवलकर, इंदलकर, मुजावर मॅडम आदी न्यायवृंदातर्फे पनवेल वकील संघटना नवनिर्वाचित कार्यकारिणीचा परिचय, सत्कार आयोजित करण्यात आला होता. पनवेल वकील संघटना सन २०२२ ते २०२५ साठीच्या कार्यकारिणी निवडणुकीत ९१ टक्के मतदान झाल्याबद्दल जागरूक वकील मतदारांचे कौतुक करण्यात आले.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने सलग तिसऱ्यांदा अध्यक्षपदी विराजमान होण्याचा बहुमान प्राप्त झालेल्या अॅड. मनोज भुजबळ यांचे हार्दिक अभिनंदन करत त्यांना बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅण्ड गोवाच्या येणाऱ्या निवडणुकीत उमेदवारीसाठी आणि निवडून येण्यासाठी तिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जयराज वडने यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

कार्यकारिणीचे प्रल्हाद खोपकर, सीमा भोईर, सुशांत घरत, तोकडे, विशाल मुंडकर, प्रगती माळी, छाया म्हात्रे आणि भूषण म्हात्रे आदींचे स्वागत, सत्कारदेखील न्यायवृंदातर्फे करण्यात आले.

बार-बेंच समन्वय वृद्धिंगत करणे, ज्युनिअर वकिलांना सहकार्य करणे, न्यायालय इमारतीच्या समस्या तडीस नेणे यादिशेने वाटचाल करत असताना न्यायवृंदानेदेखील सहकार्याची भूमिका घेऊन वकील संघटनेची ध्येय्यपूर्ती करण्यासाठी पुढे यावे, असे भुजबळ यांनी व्यक्त केले.

## तळोजा परिसरात मद्यसाठा जप्त

**पनवेल :** मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने तालुक्यातील तळोजा फेज २ सेक्टर २६ शिर्के लेबर कॅम्प परिसरात छापा टाकून मोठ्या प्रमाणात देशी-विदेशी साठा हस्तगत केला आहे. तालुक्यातील तळोजा फेज २ सेक्टर २६ शिर्के लेबर कॅम्प परिसरात बेकायदेशीररीत्या देशी- विदेशी मद्य साठा करून त्याची विक्री होत असल्याची माहिती मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार त्यांच्या विशेष पथकाने छापा टाकून जवळपास १९ हजार ९४० रुपये किमतीचा मद्यसाठा हस्तगत केला असून एका व्यक्तीविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

# पनवेलच्या सीएला शस्त्रखरेदीत अडकविण्याचा प्रयत्न फसला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या एका सनदी लेखापालाला बेकायदेशीर अग्निशस्त्र खरेदी करण्याच्या प्रकरणात अडविण्याचा सिनेमा स्टाईल प्रयत्न फसला. फसवणूक प्रकरणात सनदी लेखापालाने कार्यालयात २२ वर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकविल्याचा राग मनात धरून या वादग्रस्त कर्मचाऱ्यानेच सनदी लेखापालाला अडकविण्याचा प्रयत्न केला. बंगळुरूमधील कब्बन पार्क पोलीस ठाण्यात दाखल या घटनेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सनदी लेखापाल भाविन गडीया यांच्या कार्यालयात बेंगलोर येथील कब्बन पार्क पोलीस ठाण्याचे पोलीस ताब्यात घेण्यासाठी आले. बंगळुरू येथे बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या राहुल नामक आरोपीने तुमचे नाव घेतल्यामुळे तुम्हाला चौकशीसाठी बंगळुरूला यावे लागेल असे पोलिसांचे म्हणणे होते. भाविन गडिया यांना पनवेल पोलिसांच्या संमतीने बंगळुरूला नेण्यात आले. भाविन गडीया यांच्या चौकशीत संबंधित आरोपीने गडीया यांना मुंबई वेळोवेळी मोबाईलवर मॅसेज पाठविले असल्याचेही समोर आले. भाविन गडीया यांनीच मला दोन देशी बनावटीच्या पिस्तूल आणि चार जिवंत काडतूसे विकण्यासाठी बंगळुरूला पाठविल्याचे राहूलचे म्हणणे होते. राहूलची अधिक चौकशी केल्यानंतर भाविन गडिया यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या इरफान भोपाळी याच्या सांगण्यावरूनच भाविन यांना या प्रकरणात अडकविण्याचा डाव आखल्याची कबुली दिली.

### मुख्य सूत्रधार जेलमधूनच ताब्यात

**सेल्स टॅक्स विभागाच्या खोट्या नोटीस प्रकरणातून जामिनावर सुटल्यानंतर इरफानने पनवेलमध्ये एका महिलेला घर घेण्याच्या बहाण्याने ६० लाखांची फसवणूक केली होती. या प्रकरणात तळोजा जेलमध्ये असतानाच बंगळुरू पोलिसांनी इरफानला ताब्यात घेतले होते. या प्रकरणात त्याची मुख्य भूमिका असल्याचे उघड झाले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.**

कार्यालयात काम करीत असल्याचा गैरफायदा घेवून सेल्स टॅक्स विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून खोट्या नोटीस पाठवून गडीया यांच्या ग्राहकांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न इरफानने केला होता. इरफान आणि सेल्स टॅक्सच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याला कोट्यवधीची रक्कम मागितल्याप्रकरणी लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले. २२ वर्षे काम केलेल्या मालकानेच आपल्याला जेलमध्ये अडकवले याचा राग मनात धरून इरफानने भाविन गडीया यांना अडकविण्यासाठी हे सिनेमास्टाईल कुबाड रचल्याचे चौकशीत उघड झाले. मुंबईतून कब्बन पार्क परिसरात शस्त्रे घेऊन जाताना वेळोवेळी मेसेज पाठवून कळविले होते. त्यामुळे पोलिस देखील चक्रावून गेले, परंतु त्यावर गडिया यांचा कोणताही प्रतिसाद नसल्यामुळे बंगळुरू पोलीसदेखील कोड्यात पडले होते.

तुमचे जुने कोणाशी वैर आहे का, तुमचे कोणाशी शत्रुत्व आहे का हा प्रश्न विचारल्यानंतर खोट्या नोटीस प्रकरणी इरफानवर केलेली कारवाई पोलिसांना सांगितल्यानंतर पोलिसांना अटक आरोपीकडून ही कबुली मिळविण्यास यश आले.

## रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईलची चोरी

**पनवेल :** रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईल चोरी झाल्याची घटना घडली असून याबाबत प्रवाशाने पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. व्यापारी बाल सुब्रमण्यम चार्य मुनुगंटी हे त्यांच्या कुटुंबीयांसह मडगाव एक्सप्रेसने मुंबईला येत होते. या प्रवासादरम्यान त्यांच्या मोबाईलची चोरी झाल्याची घटना घडल्याने त्यांनी याबाबत पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



## खांदा कॉलनीत पोलीस मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमधील आनंदी ग्रुपच्या वतीने गुन्ह्याबाबत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पोलीस इन्स्पेक्टर सचिन पवार व पिसाळ यांनी गुन्हेगार व गुन्हेपद्धतींविषयी विविध उदाहरणासह उपयुक्त माहिती दिली. दोघांचेही आनंदी ग्रुपतर्फे आभार मानण्यात आले.

समाजामध्ये होत असलेल्या फसवणुकीबाबत जनजागृती करण्यासाठी एक छोटे खानी मेळावा घेण्यात आला. यामध्ये ऑनलाइन व सोशल मीडियावर होत असलेल्या फसवणुकीबाबत पोलिसांनी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन संजय पाटील (गुरु) यांनी केले व आभार भाजप नेते भीमराव पवार यांनी मानले. खांदा कॉलनीमधील आनंदी ग्रुपच्या अंतर्गत भरपूर कार्यक्रम केले जातात.

## भाजपतर्फे नेत्र तपासणी शिबिर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष कळंबोलीच्या वतीने दोन दिवसीय नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात शनिवारी (दि. १४) झाली. रविवार (दि. १५)पर्यंत हे शिबिर आहे.

या शिबिरात सकाळी १० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत मोफत मशिनद्वारा नेत्र तपासणी करून मिळेल व कमी किमतीमध्ये चष्मा बनून देण्यात येणार असून कळंबोली सेक्टर-८ सत्यकुंज सोसायटी येथील भारतीय जनता पक्ष आमदार जनसंपर्क कार्यालय येथे आहे.

कळंबोली शहर मंडळ अध्यक्ष रविनाथ चरू पाटील व भारतीय जनता पक्ष कळंबोलीचे कार्यालयीन चिटणीस जगदिश खंडेलवाल यांच्या सौजन्याने हे शिबिर आयोजित केले आहे. जास्तीत जास्त लोकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील आबासाहेब मराठे आर्ट्स, न्यू कॉमर्स, सायन्स कॉलेजला 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. हा निधी कॉलेजमध्ये सोलर पॅनेल आणि कम्प्युटर लॅबसाठी वापरण्यात येणार आहे. या मदतीचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. संजय मेस्त्री यांच्याकडे शनिवारी सुपूर्द केला. या वेळी पिंपरी कॉलेजच्या ग्रंथपाल डॉ. तृप्ती अंब्रे, सामाजिक कार्यकर्ते उद्धव पवार, श्री. उगले आदी उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)







**पनवेल : मुंबई विद्यापीठ अधिसभा (सिनेट) सदस्यपदी पनवेल येथील मयुरेश नेतकर यांची राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी नियुक्ती केली आहे. याबद्दल नेतकर यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक (जेबीएसपी) संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी 'जेबीएसपी'च्या वतीने महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नेतकर यांचा सत्कार करण्यात आला. इतर मान्यवरांनीही नेतकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी चिन्मय समेळ, राकेश भुजबळ आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप ओबीसी सेल तालुका उपाध्यक्ष शांताराम पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, विश्वनाथ कोळी, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, माजी सरपंच राम पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)



**पनवेल : अनंत जोमा घरत यांचा मुलगा संकेत अनंत घरत यांच्या नवीन घराची वास्तूशांती झाली. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे भेट देत पूजेचे दर्शन घेतले. त्यांचे घरत कुटुंबीयांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी गुलाब घरत व अन्य उपस्थित होते.**

# मनमोहन देसाई आज तुम्ही हवे होता...

**माझ्या आवडत्या चित्रपट दिग्दर्शकांतील एक मनमोहन देसाई आहेत असे म्हणताक्षणीच अनेकांच्या भुवया भारीच उंचावतात. स्टीव्हन स्पीलबर्ग, अकिरा कुरोसावा, मजिदी मजिद, फ्रॅन्का त्रूफॉ अशी मोठ्ठी मोठ्ठी नावं न घेता मनजींचे नाव घेणे म्हणजे, वातानुकूलित बसच्या जमान्यात एसटीने प्रवास करण्यास पसंती देण्यासारखे असले तरी यातच सहप्रवाशांच्या सुख दुःखाची काही प्रमाणात ओळख होते. खरा माणूस आणि माणूसकी कळते, अनुभवता येते.**

मनमोहन देसाईंना चित्रपटसृष्टी आणि आम्ही मिडियावाले मनजी म्हणत. त्यांचे अद्भुत आणि चमत्कारिक पिक्चर एन्जॉय करण्यात मस्त टाईमपास होई म्हणून कधी त्यांना 'फनजी' म्हटले जाई. अशा मनजींची आजच्या काही अनाकलनीय बातम्या वाचून भारीच आठवण येते. एक तर ते आज हवे होते अथवा त्यांनी पुनर्जन्म घ्यावा. अर्थात, त्यांच्याही चित्रपटात काही तरी भन्नाट आणि चमत्कारिक असे काही पाह्यला मिळे आणि ते चक्क पचनी पडत असे. अमर अकबर ॲन्थनी हे तिघे एकाच वेळेस आपल्या आईला रक्तदान करतात आणि या पिक्चरची टायटल सुरू होतात हे फक्त आणि फक्त त्यानाच सुचले आणि पब्लिकने प्रचंड टाळ्या आणि शिट्ट्या वाजवत अख्खं थिएटर डोक्यावर घेतले.








त्या हाऊस फुल्ल पब्लिकमध्ये मीही एक होतो. त्या तिघांनाही माहित नाही की आपण लहानपणी हरवलेले भाऊ आहोत आणि ही आपली माॅ आहे. खास मनजी टच. 'मद'मध्ये तर त्यांनी नायकाचा (अर्थात अमिताभ बच्चन) पिता (दारासिंग) दोरखंड टाकून/ अडकवून विमानाला टेक ऑफ घेऊ देत नाही असे दाखवले आणि हे पाहताना पब्लिक श्वास रोखून धरत असे. आता मी चित्रपट समीक्षक होतो आणि तरीही मी श्वास रोखून हा सीन पाहायला. प्रेक्षकांचा असा विश्वास कमावणे हे दिग्दर्शकाचे खूपच मोठे यश असते. भल्या भल्या दिग्दर्शकांना अनेक हिट पिक्चर देऊनही स्वतःचा हुकमी ऑडियन्स तयार करता येत नाही.

**अशा मनजींची आत्ताच आठवण का यावी?**

याला दोन ठळक कारणे आहेत. सत्तरच्या दशकात मनजी 'बाजीराव मस्तानी' या भव्य चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होते अशी अतिशय दुर्मीळ जाहिरात सोशल मिडियात पाह्यला मिळाली. सोशल मिडिया कधी कधी काही फ्लॅशबॅक ची चांगली मेजवानी देतो. राजेश खन्ना बाजीराव आणि हेमा मालिनी मस्तानी साकारणार होते. काशीबाई कोण हे त्यात नसले तरी त्या काळातील फिल्मी दुनिया पाहता रेखा अथवा राखी परफेक्ट होत्या. आता इतिहास अभ्यासक आणि प्रेमींना माहित्येय मस्तानी आणि काशीबाई एकत्र येऊन नृत्य गीत सादर करु शकत नाहीत, पण हिंदी पिक्चर म्हटलं की कुछ भी हो सकता है यारो हे दिग्दर्शक संजय लीला भन्सालीने 'देवदास 'मध्ये पारो आणि चंद्रमुखी यांच्या तर 'पद्मावत 'मध्ये मस्तानी आणि काशीबाई यांच्या नृत्यातून पडदाभर साकारले. वितरकांची तशी डिमांड होती म्हणे. मनजींनी असे नक्कीच केले नसते. याचे एक कारण म्हणजे, हा त्यांच्या पठडीतील चित्रपट नव्हता आणि त्यांचे पिक्चर म्हणजे, कुछ भी, कही भी, कैसे भी, कहां भी असे असले तरी त्यांनी असे केले नसते. त्यांनी बाजीराव व काशीबाई यांच्यावर दोन प्रेमगीत दाखवली असती. एकादे सणाचे गाणे दाखवले असते. त्यांच्या 'ब्लफमास्टर 'मधील गोविंदा आला रे आला, 'सच्चा झूठा'मध्ये मेरी प्यारी बहेनीया बनेगी दुल्हनिया (आपल्या देशात लग्न म्हणजे जणू एक कौटुंबिक सण असतो), 'सुहाग'मध्ये 'ओ शेरोवाली' हे गरबा गीत अशी सणगीते आजही सुपर हिट आहेत. मनजींना चित्रपट संगीताचा अतिशय उत्तम कान आणि दृष्टी होती हे त्यांचा पहिला चित्रपट 'छलिया' (१९६०) पासूनच दिसतेय. मला आठवतय, 'गंगा जमुना सरस्वती' (१९८८)पासून आपण दिग्दर्शन निवृत्ती घेत आहोत हे त्यांनी जाहीर करताच आमच्या गिरगावातील खेतवाडीतील प्रताप निवासमधील त्यांच्या निवासस्थानी त्यांची मुलाखत घेत असताना ते मला म्हणाले, नौशाद माझे अतिशय आवडते संगीतकार, त्यांच्यासोबत एक म्युझिकल चित्रपट दिग्दर्शित करायचा होता...यावरून मनजींची संगीत बांधिलकी लक्षात येते... तात्पर्य, मनजींचा 'बाजीराव मस्तानी' पडद्यावर यायला हवा होता.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

अशातच एक वेगळीच बातमी वाचतानाच मनजी आठवले. 'जगाच्या पाठीवर' कुठेना कुठे काही भलतं सलतं विचित्र असे काही घडत बिघडत असतेच. युरोपमध्ये कुठे तरी एका स्त्रीने जुळ्याना जन्म दिल्यानंतर यांचे पिता भिन्न आहेत असे तिच्या लक्षात आले. आश्चर्य असले तरी हा रिलिटी शो आहे म्हणे. लग्नानंतर आपले आणखीन एका पुरुषाशीही संबंध आले होते असे ती म्हणाल्याचे या बातमीत म्हटलयं हे ही बातमी सर्च केल्यावर तुमच्या लक्षात येईल. असे संबंध अयोग्यच, पण काही कारण असेलही. या बातमीत यातील वैद्यकीय गोष्टीही देण्यात आल्या आहेत. अर्थात, 'जगाच्या पाठीवर' हे असे जुळ्या मुलांचे दोन स्वतंत्र पिता असं काहीही वाट्टेल ते घडू शकले ही म्हटलं तर जगातील आठवे आश्चर्य असलेली बातमी आहे आणि म्हटलतं तर 'आपली ही संस्कृती नाही'. तुम्ही दोन्ही बाजू समजून घ्या. मनजी याच थीमवर मसालेदार मनोरंजक चित्रपट पडद्यावर आणण्यात यशस्वी ठरले असते.त्यांनी यात नेहमीप्रमाणे सिनेमॅटीक लिबर्टी घेतली असती. एक स्त्री गरोदर असतानाच दुर्दैवाने तिच्या पतीचा तो प्रामाणिक असल्याने त्याची खलनायकाकडून हत्या होते. आता ती दीराशी दुसरं लग्न करते आणि मग जुळ्या मुलांना जन्म देते. नवस फेडून येत असतानाच प्रचंड पाऊस वादळ यामुळे गाडीला अपघात होतो आणि एका बाजूला पित्यासोबत एक मुलगा व आईसोब एक मुलगा अशी ताटातूट होते. एक 'रामपूर का लक्ष्मण' बनतो, मोठेपणी तो 'कुली' बनतो तर दुसर्याची 'परवरीश' श्रीमंत घरात होते. तो तब्येतीने 'मर्द' असतो. एक धनाढ्य व्यक्तीने पित्यासह या मुलाला आपल्या कुटुंबात आश्रय दिलेला असतो, पण क्लायमॅक्सला समजते, हाच आपल्या पहिल्या पित्याचा खूनी...अर्थातच दरम्यान लहानपणी या जुळ्यांच्या हातावर काढलेल्या टॅटूने या जुळ्यांची ओळख पटलेली असते. यात 'सच्चा झूठा' असा फरक नसतो...दोन नायकांना दोन नायिका आहेतच. एक शहरी, एक ग्रामीण. विशेष उल्लेखनीय गोष्ट, हे जुळे भाऊ असले तरी 'राम और श्याम 'सारखे एकसारखेच दिसत नाहीत. दोघांचे पिता भिन्न असल्याने हे दोघे दिसायलाही वेगळे. दिग्दर्शक टच. आणि या पिक्चरचे नाव, 'भाई हो तो ऐसा'. याच नावाचा त्यांचा १९७२ चित्रपट होताच. एकाच दिग्दर्शकांने एकाच नावाचा चित्रपट दोनदा दिग्दर्शित केल्याचेही होईल.

मनजींचा पिक्चर तब्बल अठरा रिळांचा सहज असे, पण तो पाहताना अजिबात कंटाळा येत नसे. याचे कारण अर्थातच पब्लिकने ठरवूनच टाकलेले असे, मनजींची आपली एक अतिरंजित मनोरंजनाची शैली असून तीच माईंड सेट करून त्यांचे पिक्चर एन्जॉय करायचे.

हल्ली अशी एकादी धक्कादायक बातमी समजली रे समजली की मला मनमोहन देसाई हटकून आठवतातच आणि त्यांच्या पिक्चरला हा फॉर्मुला फिट्ट बसला असता असेच वाटते. कुठेतरी एकाद्या लग्नात नवरीचे फोटो काढणारा जास्तच लगट करतो म्हणून नवरा त्या फोटोग्राफरलाच मारतो ही बातमी तुम्ही पाहिली असालच. पिक्चरची स्टोरी सुरू होताना हाच फोटोग्राफर या लग्नाचा एकही फोटो आणि व्हिडिओ शिल्लक ठेवत नाही आणि या दाम्पत्याकडे आपलं लग्न झाल्याचा एकही पुरावा नसल्याने सिनेमाभर गोंधळ निर्माण होतो आणि ते एकमेकांना 'आ गले लग जा' असे म्हणू शकत नाहीत.

आज खरोखरच मनजी हवे होते अथवा त्यांनी पुनर्जन्म घ्यावाच अशाच गोष्टी आज घडताहेत... तरदेखील म्हटले जाई, मनमोहन देसाईंच्या चित्रपटात वास्तव असे काही नसे. वास्तवात काहीही घडू शकते म्हणूनच मनजींच्या चित्रपटात काहीही घडायचे आणि अनपेक्षित असे काही घडणे यही तो है जिंदगी...










# केंद्रशासन सहाय्यित कृषी योजना

**ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि निसर्गसौंदर्याने नटलेला रायगड जिल्हा भात उत्पादनाचे कोठार आहे. नाचणी हे पौष्टिक तृणधान्य सुद्धा येथे मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. तर उरणपासून श्रीवर्धनपर्यंतच्या सागरी किनाऱ्यामुळे मत्स्य व इतर सागरी उत्पादने ही सुद्धा रायगडची वैशिट्यपूर्ण ओळख आहे. मुंबई महानगराची नजीकता जिल्ह्याच्या कृषी बरोबरच औद्योगिक विकासाला चालना देत आहे.**

जिल्ह्यामध्ये कृषी यांत्रिकरण योजनेत दोन हजार ६८ लाभार्थ्यांनी, सामुहिक शेततळे योजनेत ३५ लाभार्थ्यांनी, कृषी व मत्स्य प्रक्रिया उद्योग योजनेत १६ लाभार्थ्यांनी, भाजीपाला रोपवाटीका योजनेत १७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत तीन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झाल्या आहेत. या योजनांमधील शेतकरी सहभाग मोठ्या प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे. आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, जांभूळ यांची लागवड करणे, त्यावरील प्रक्रिया उद्योग उभारणे, कृषी पर्यटन, इत्यादीमध्ये नवयुवक शेतकऱ्यांना खूप संधी आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये भात, नाचणी, आंबा, काजू ही पिके मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांची उत्पादकता १० ते २५ टक्क्यांनी वाढविण्यासाठी कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून तंत्रज्ञान विस्तार कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत नुकसान भरपाई आणि विमा संरक्षण देण्यात येत आहे.

कृषी विभाग पीक उत्पादनाबरोबर काढणीत्तोर व्यवस्थापन प्रक्रिया, साठवणूक इत्यादी प्रकल्पांच्या माध्यमातून कृषी मालाचे मूल्यवर्धन करण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्ह्याला असलेल्या १२२ कि.मी. सागरी किनाऱ्यामुळे एक जिल्हा एक उत्पादन या अंतर्गत 'मत्स्य व इतर सागरी उत्पादने' कार्यक्रमास गती देण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना शेतकऱ्यांना माहीत व्हाव्यात, यासाठी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले व त्यांच्या सहकारी– अधिकाऱ्यांच्या सहकार्याने ही कृषी योजनांची लेख मालिका सुरु करण्यात आली आहे.

**अ) केंद्रशासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना उद्देश :–** असंघटीत उद्योगांना संघटित करणे, कार्यरत असलेले व नवीन स्थापित होणारे वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग तसेच शेतकरी उत्पादक कंपनी, गट, संघटन व सहकारी उत्पादक संस्था यांची पतमर्यादा वाढविणे. फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया, मसाला पिके, मत्स्य, दुग्ध व किरकोळ वन उत्पादनावर आधारित सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग.



**पात्र लाभार्थी :** वैयक्तिक लाभार्थी– युवक, शेतकरी, महिला, उद्योजक, कारागिर, बेरोजगार, भागीदार व मर्यादित दायित्व असलेले भागीदार.

**गट लाभार्थी–** स्वयंसहाय्यता गट उत्पादक गट/संस्था/ कंपनी, उत्पादक सहकारी संस्था इ.

**लाभार्थी निकष :–** अर्जदार उद्योगावर मालकी अधिकार (प्रोप्रायटरी भागीदारी).

**वैयक्तिक–** अर्जदाराचे वय १८ वर्ष व किमान ८ वी पास, प्रकल्प किंमतीच्या किमान १० ते ४० टक्के लाभार्थी हिस्सा देण्याची व उर्वरित बँक कर्ज घेण्याची तयारी असावी.

**गट–** एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) धोरणानुसार निवडलेल्या उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये कार्यरत फार्मर प्रोड्यूसर गट (FPO), स्वयंसहाय्यता गट (SHG), उत्पादक सहकारी संस्था यांच्या नवीन उद्योगांना प्राधान्य तसेच एक जिल्हा एक उत्पादन नसलेल्या (Non-ODOP) उत्पादनांनादेखील नवीन उद्योगांना लाभ देय आहे. फार्मर प्रोड्यूसर गट (FPO), कंपनी, सहकारी उत्पादक यांची उलाढाल किमान एक कोटी असावी. हाताळल्या जाणाऱ्या उत्पादनाबाबत तीन वर्षांचा अनुभव.

**ब) रायगड जिल्ह्याकरिता एक जिल्हा एक उत्पादन मत्स्य व सागरी उत्पादने**

प्रकल्प किंमत व खेळत्या भांडवलासाठी कमीत कमी १० टक्के आणि जास्तीत जास्त ४० टक्के स्वनिधी भरण्यासाठीची तरतूद प्रोड्यूसर गट (FPO), स्वयंसहाय्यता गट (SHG)/ उत्पादक सहकारी संस्था यांची असावी किंवा ही रक्कम राज्य शासनाच्या योजनेतून मंजूर असावी. एक जिल्हा एक उत्पादन(ODOP) अंतर्गत नवीन व सद्यःस्थितीत कार्यरत तसेच छेप–उजजझ आणि सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे विस्तारीकरण आधुनिकीकरण करता येते.

**अर्थसहाय्य :–** वैयक्तिक लाभार्थी भांडवली गुंतवणूकीकरिता ३५ टक्के १० लाखा रुपयांपर्यंत,भांडवली गुंतवणूक व सामाईक सुविधा लाभार्थी ३५ टक्के अनुदान कमाल केंद्र शासनाच्या विहित मर्यादेत, मार्केटिंग व ब्रॅडिंग, ५० टक्के अनुदान कमाल केंद्र शासनाच्या विहित मर्यादेत, इन्क्यूबेशन सेंटर, शासकीय संस्था १०० टक्के, खाजगी संस्था ५० टक्के,अनुसूचित जाती व जमाती ६० टक्के, स्वयंसहायता गटांना सदस्यांना बीज भांडवल (MSRLM व MSULM मार्फत) ४० हजार रुपये प्रति सदस्य, प्रशिक्षणासाठी १००० टक्के अनुदान.

अधिक माहितीसाठी www.pmfme.mofpi.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जिल्हा संसाधन व्यक्ती, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**–मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड–अलिबाग**

# ...म्हणून साजरी केली जाते मकरसंक्रांत

**मकरसंक्रांत हा जानेवारी महिन्यात साजरा केला जाणारा हिंदूंचा प्रमुख सण आहे. हा मुख्यतः जानेवारी महिन्याच्या १४ किंवा १५ तारखेला साजरा केला जातो. जेव्हा सूर्य दक्षिणायन ते उत्तरायण मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा मकरसंक्रांतीचा सण साजरा केला जातो. या दिवसापासून वर्षातील सणांची सुरुवात होते असे मानले जाते. देशातील विविध राज्यांमध्ये याला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. पंजाब आणि हरियाणामध्ये लोहरी, पश्चिम बंगालमध्ये उत्तर संक्रांती, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये उत्तरायण किंवा खिचडी, आंध्र प्रदेश, केरळ आणि कर्नाटकमध्ये संक्रांती, तमिळनाडूमध्ये पोंगल आणि आसाममध्ये बिहू म्हणून ओळखले जाते.**

भारताला सणांची भूमी म्हटले जाते, आणि देशात अनेक सण विविध धर्माच्या लोकांद्वारे देशाच्या विविध भागात साजरे केले जातात. प्रत्येक सण साजरा करण्यामागे काही ना काही धार्मिक, काही पौराणिक कारण किंवा काही श्रद्धा अथवा कथा असाव्यात, पण मकरसंक्रांत हा या सगळ्यांपेक्षा वेगळा सण आहे.

मकरसंक्रांत हा सण पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी देवाचे आभार मानण्यासाठी आणि शेतकऱ्यांवर सदैव कृपा ठेवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी शेतीत वापरल्या जाणाऱ्या नांगर, कुदळ, बैल इत्यादींची पूजा केली जाते आणि शेतकऱ्यांवर देवाची कृपा सदैव राहावी यासाठी सूर्यदेवाची पूजा केली जाते.

हिंदूंच्या मुख्य सणांपैकी एक मकर संक्रांतीचा हा सण जानेवारी महिन्यात १४ किंवा १५ तारखेला मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हिंदू दिनदर्शिकेनुसार पौष महिन्यात जेव्हा सूर्य दक्षिणायन ते उत्तरायण म्हणजेच मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा मकर संक्रांतीचा हा सण साजरा केला जातो. देशाच्या विविध भागांमध्ये इतर नावांनी साजरा केला जातो, परंतु सर्वत्र सूर्याची पूजा केली जाते. देशातील विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावांनी असलेल्या या उत्सवात, पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी भगवान सूर्याची पूजा केली जाते आणि त्यांचे आभार मानले जातात. मकर संक्रांतीच्या सणात तीळ, गूळ, ज्वारी, बाजरी यापासून बनवलेले पदार्थ सूर्याला अर्पण केले जातात आणि नंतर लोक त्यांचे सेवनही करतात.

विविध मान्यतेनुसार, अनेक ठिकाणी पवित्र नद्यांमध्ये स्नान करण्याची प्रथा आहे. या दिवशी भगवान सूर्याची पूजा आणि दान करण्याची प्रथा आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी सूर्य दक्षिणायनातून उत्तरायणात प्रवेश करतो याला मकर राशीत प्रवेश असेही म्हणतात. सूर्याच्या मकर राशीतील प्रवेशाला वैज्ञानिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. सूर्य दक्षिण गोलार्धातून उत्तर गोलार्धात जाऊ लागतो, यालाच आपण 'उत्तरायण' म्हणतो. अध्यात्मिक दृष्टीकोनातून असे असणे अत्यंत शुभ मानले जाते. या शुभ दिवशी लोक पवित्र नद्यांमध्ये स्नान करून आपले पाप धुतात आणि सूर्यदेवाची पूजा करतात आणि त्यांचे आशीर्वाद घेतात. या दिवशी लोक दानदेखील करतात, असे मानले जाते की दान केल्याने सूर्य देव प्रसन्न होतो आणि मोक्ष प्राप्त होतो.

सूर्याचा दक्षिण गोलार्धातून उत्तर गोलार्धात प्रवेश अत्यंत शुभ मानला जातो. आरोग्याच्या दृष्टीकोनातून हे खूप शुभ मानले जाते. त्यामुळे दिवसांची वेळ बदलू लागते. मकर संक्रांतीचा सण आनंद घेऊन येतो. अनेक ठिकाणी या दिवशी पतंग उडवण्याचीही प्रथा असून पतंगबाजीचे आयोजनही केले जाते. प्रौढ आणि मुले मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतात.

या दिवशी आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरलेले असते. लहान मुलांमध्ये पतंग उडवण्याचा प्रचंड उत्साह असतो. सर्व मुले या दिवसाची अगोदर तयारी करतात आणि पतंग, मांजा इत्यादी खरेदी करून घरी ठेवतात. अनेक ठिकाणी या दिवशी पतंग उडवण्याच्या स्पर्धाही आयोजित केल्या जातात. यानिमित्ताने दिवसभर आकाश पतंगांनी भरलेले असते.

मकरसंक्रांतच्या या पवित्र दिवशी नद्यांमध्ये स्नान करावे असे मानले जाते. त्यामुळे लोक गंगेच्या घाटावर स्नान करायला जातात. हे एका मेळ्याच्या स्वरूपातदेखील आयोजित केले जाते ज्याला अर्ध कुंभ आणि महा कुंभ मेळा असे नाव दिले जाते. वाराणसीमध्ये दरवर्षी अर्ध कुंभ मेळा भरतो आणि प्रयागच्या संगमावर महाकुंभ आयोजित केला जातो. हा महाकुंभ



महाकुंभ म्हणून अनुक्रमे प्रयाग, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथील घाटांवर साजरा केला जातो. असे मानले जाते की या महाकुंभात स्नान केल्याने तुमचे वर्षांचे पाप धुऊन तुम्हाला मोक्ष प्राप्त होईल. ही जत्रा मकरसंक्रांतच्या दिवशी सुरू होते आणि महिनाभर चालते.

या दिवशी नवीन पिकाच्या भातापासून खिचडी तयार केली जाते, ज्यामध्ये विविध भाज्या घातल्या जातात. खिचडी आणि गुळाची पोळी, तिळगुळ या सणाचे महत्तवाचे पदार्थ आहे. वेगवेगळ्या चालीरीती आणि संस्कृतींनुसार हा सण देशाच्या जवळपास प्रत्येक भागात वेगवेगळ्या नावांनी साजरा केला जातो. अनेक ठिकाणी दान देण्याचीही प्रथा आहे. या दिवशी गरिबांना अन्नदान करा. अन्नदान हे महान दान मानले जाते, त्यामुळे उत्पादनात उत्पादित होणारे पीक गोरगरिबांना आणि संतांना दान करून सर्वत्र आनंदाचे वाटप करणे हा या उत्सवाचा उद्देश आहे.

मकरसंक्रांतचे स्वतःचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. देशभरातील लोक हा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरा करतात. हा हिंदूंचा एक प्रमुख सण आहे ज्याचा उद्देश परस्पर बंधुभाव, ऐक्य आणि आनंद सामायिक करणे हा आहे. या दिवशी इतर धर्माचे लोकही पतंग उडवण्यात हात आजमावून मजा घेतात.

**(साभार : वेब दुनिया)**

# पोलादपूर तहसीलसमोरील उपोषणाची सांगता

## तिसऱ्या दिवशी आमदार प्रवीण दरेकर यांची यशस्वी मध्यस्थी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दिविल ग्रामपंचायतीमध्ये निवडणुकीच्या मतमोजणी दरम्यान जाहीर झालेला निकाल परस्पर बदलण्याच्या मनमानी कृतीविरोधात उमेदवारांचे प्रतिनिधी विश्वास नलावडे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी पोलादपूरचे भुमिपुत्र विधानपरिषद सदस्य आमदार प्रवीण दरेकर यांनी यशस्वी मध्यस्थी करीत उपोषणाची सांगता घडविली. यावेळी आमदार दरेकर यांनी जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्यासोबत उपोषणकर्ते विश्वास नलावडे यांनी मोबाईलवरून चर्चा घडवित उपोषणकर्त्यांच्या मागण्या तीन दिवसांमध्ये मान्य करण्यासंदर्भात अनुकूलता मिळविली आहे.

**उपोषणकर्ते नलावडे यांची जिल्हाधिकाऱ्यांशी घडविली चर्चा**



आमदार दरेकर यांनी उपोषणकर्त्यांची तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात भेट घेतली. यावेळी दिक्षित, महाड अध्यक्ष जयवंत दळवी, एकनाथ कासुर्डे, महेश निकम, समाधान शेठ, श्रीकांत भिलारे, मंदार गोळे, नामदेव मोरे, मंगेश जंगम, मामा बेलोसे, निलेश आंबेतकर, योगेश भोसले, अमित शेठ, गणेश शेठ, चंद्रकांत चिकणे, मनोज पवार, रूपेश सावंत, डॉ.समीर साळुंखे तसेच अन्य कार्यकर्त्यांसमवेत पोलादपूर शिरगांवकर, नाईक, नटे यांनी उपस्थित राहून उपोषणस्थळी सहकार्याची भुमिका घेतली.

या वेळी दरेकर यांनी कार्यकर्त्यांच्या संतप्त भावना जाणून घेतल्या. दिविल ग्रामपंचायतीच्या निवडणुकीतील मतमोजणीवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी २० डिसेंबरला दिलेला दोन उमेदवार विजयी झाल्याचे रायगड जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जाहिर करताना जिल्हाधिकारी कार्यालयाची दिशाभूल करण्यात आल्याचे यावेळी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी तालुकाध्यक्ष प्रसन्ना पालांडे यांच्या उपस्थितीत सांगितले. आ.प्रवीण दरेकर यांनी यावेळी रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्यासोबत मोबाईलवरून थेट संपर्क साधून स्वत: दिविल ग्रामपंचायत निवडणुकीची पार्श्वभूमी सांगून निवडणूक निर्णय अधिकारी तसेच निर्णय बदणारे तहसिल कार्यालयामधील कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली.

रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी संबंधित दोषींवर तीन दिवसांमध्ये कारवाई करण्याची ग्वाही यावेळी उपोषणकर्ते विश्वास नलावडे यांना दिली. आ. प्रवीण दरेकर यांनी यानंतर उपोषणकर्ते विश्वास नलावडे यांना फ्रुट ज्यूसचा ग्लास देऊन उपोषणाची यशस्वी सांगता केली. यावेळी डॉ. राजेश सलागरे व अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांच्या तब्येतीची वेळोवेळी तपासणी करून तसे अहवाल वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. भाग्यरेखा पाटील यांना अवलोकनार्थ सादर केले.

# पेणजवळ रेल्वे रुळाला तडे

## कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे अपघात टळला



**पेण : प्रतिनिधी**

पेणनजीक रेल्वे रुळाला तडे जाऊन रुळाचा काही भाग तुटला होता. रेल्वे कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे अपघात टळला आहे. यामुळे ४ रेल्वे उशिराने धावल्याने कोकण रेल्वे बाधित झाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पेणवरून पनवेलला जाणाऱ्या रेल्वे रुळाला जिते ते आपटा या दोन रेल्वे स्थानकाच्या दरम्यान रुळाला तडे जाऊन रुळाचा काही भाग तुटला होता. शुक्रवारी पहाटे हा प्रकार ट्रॅकमन कमलेशकुमार यांच्या निदर्शनास आला. या मार्गावर रेल्वे जाण्यापूर्वी रेल्वे कर्मचारी रुळाची पाहणी करीत असताना त्यांना सदर प्रकार सकाळी ६ वाजुन २२ मिनिटांच्या दरम्यान आढळला. याबाबत रेल्वे कर्मचाऱ्यानी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना तातडीने सुचित केले. रेल्वे अधिकाऱ्यांनी तातडीने सकाळी ५ वाजून १५ मिनिटांनी दिवा स्थानकातुन सुटणारी रोहा – दिवा या मेमु रेल्वेला जिते रेल्वे स्थानका नजीक थांबविले. यानंतर मडगाव – नागपूर स्पेशल रेल्वे, पेण येथून सकाळी ६: ४५ ला सुटणारी पेण – दिवा मेमु रेल्वे व मँगलोर– मुंबई रेल्वे या चार गाड्यांना रोखण्यात आले. त्याचप्रमाणे रेल्वे रूळ दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवरती सुरू करण्यात आले. सकाळी ७:३० वाजता रेल्वे रुळाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले. १० ते ३० किलोमीटर प्रतितास या वेगाने सदर रुळावरून रेल्वे पुढे पाठविण्यात आल्या. थंडीमुळे रेल्वे रुळाला तडे जाण्याचे प्रकार घडत असतात अशी माहिती यावेळी रेल्वे प्रशासनाकडून कडून देण्यात आली.

# पद्मदुर्ग किल्ल्यावर आज जागर कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड समुद्र किनाऱ्यापासून ३ किलोमिटर अंतरावर राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी खोल अरबी समुद्रात ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला बांधण्यात आला होता. किल्ल्यावर स्वच्छता राहवी व किल्ल्याचे संवर्धन व्हावे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी किल्ल्यावर दरवर्षी पद्मदुर्ग जागर समिती व संवर्धन समिती मुरुड पद्मदुर्ग जागर कार्यक्रम आयोजित केले जाते. यंदाही मुरुड पद्मदुर्ग जागर व संवर्धन समिती तसेच कोकण कडा मित्रमंडळ रायगड यांच्यावतीने रविवार १५ जानेवारी २०२३ रोजी करण्यात आले आहे.

गड स्वच्छता, साहसी खेळ, पारंपरिक गोंधळ–लोकनृत्य, शिवव्याख्यान पोवाडे, पद्मदुर्ग दर्शन घेण्यासाठी शिवमावळ्यांनी दुर्ग शिवरायांचा आपल्या स्वाभिमानाचा पद्मदुर्ग जागर एक दिवस इतिहासाचा साक्षीदार होण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन मुरुड पद्मदुर्ग जागर व संवर्धन समिती अध्यक्ष आशिल ठाकुर यांनी केले.



या कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे, अलिबाग मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी, महाडचे आमदार भरतशेठ गोगावले, उरणचे आमदार महेश बालदी, कोकण कडा मित्र मंडळ रायगड नितीन पावले, रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर संघटना अध्यक्ष विजय पाटील, माजी नगराध्यक्षा मुरुड स्नेहा पाटील, पौराहित्य– प्रकाश कदम, कोकण कडा मित्र मंडळ सदस्य शेखर फरमन, पद्मदुर्ग जागर समिती उपाध्यक्ष संकेत आरकशी, पद्मदुर्ग जागर समिती सचिव राहुल कासार, माजी सचिव मदन हनुमन्ते, कोकण कडा मित्र मंडळ उपाध्यक्ष – संकेत वडके, सचिव ज्ञानेश्वर काकडे, सदस्य सिध्देश मोरे, सदस्य परेश सोनावले, बोट व्यवस्थापक बाळा साखरकर, पद्मदुर्ग जागर समिती अध्यक्ष आशिल ठाकुर, कोकण कडा मित्र मंडळ रायगड अध्यक्ष– सुरेश पवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

रविवार १५ जानेवारी २०२३ रोजी सकाळी सहा वाजता मुरुड कोळीवाडा येथील राधाकृष्ण मंदिरापासून ते जेट्टी पर्यंत पालखी प्रस्थान, सकाळी ७ते ९ वाजता स्वच्छता मोहीम, सकाळी १० वाजता गडदेवता पुजन सकाळी ११ वाजता व्याख्यान शिवपालखी सोहळा व मर्दानी खेळ, दुपारी १ ते २ वाजेपर्यंत महाप्रसाद ,दुपारी २ वाजता पद्मदुर्ग किल्ल्यापासून ते मुरुडकडे प्रस्थान होणार आहे.

# पेडलीच्या सुमित साबळेची उतुंग भरारी

**रेल्वेमध्ये अकाऊटंट असिस्टंटची परीक्षा उत्तीर्ण**



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पेडली येथील युवक सुमित साबळे रेल्वेमध्ये अकाऊटंट असिस्टंट पदाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. सुमित गेली चार वर्षांपासून एमपीएससी परीक्षेची तयारी करीत असताना त्याला हे सुयश प्राप्त झाले आहे.२०१९ मध्ये रेल्वेच्या एनटीपीसी जाहिरातीनुसार सुमितने परीक्षा फॉर्म भरला होता.

कोविडच्या प्रादुर्भावामुळे परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. जानेवारी २०२१ मध्ये सुमितने पूर्व परीक्षा दिली होती. २०२२ मध्ये सुमितची मुख्य परीक्षेसाठी निवड झाली. जवळपास ७ ते ८ लाख उमेदवारांची मुख्य परिक्षेकरिता निवड झाली होती व जागा ३ हजार आठशे. परंतु २०२३ ला लागलेल्या निकालात सुमितने अभ्यासाच्या जोरावर बाजी मारली व क्लास तीनची परीक्षा उत्तीर्ण होत रेल्वेच्या अकाऊटंट असिस्टंटपदी निवड झाली. सुमितच्या यशामागे त्याचे अथक परिश्रम, आई वडील, नातेवाईक व मित्रमंडळी या सर्वांची साथ लाभल्याचे सुमितने सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे उसर्ली खुर्द तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विघमान कब्जेदार १. श्री अशुतोष गुणवंत अभ्यंकर, २. श्री मिलींद बळवंत नेने यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे उसर्ली खुर्द तहसिल व पोटतुकडी पनवेल जिल्हा रायगड व तुकडी रायगड येथील जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती, उसर्ली खुर्द ग्रामपंचायत हददीतील व. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| सर्व्हे.नं गट नं | हिस्सा नं | क्षेत्र हे. आर. चौ.मी | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५८ | | लावणी लायक ०–५०–६० पोट खराबा ०–००–०० | ३.५६ |
| | | एकूण ०–५०–६० | |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा, वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरिल मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालका बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल,**
**दिनांक :– १४/०१/२०२३**

**कार्यालयीन पत्ता**
बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार कार्यालया समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए;एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)


# अलिबाग येथे २० फेब्रुवारी रोजी एकपात्री, द्विपात्री अभिनय स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

सलग पाच वर्ष अलिबागमध्ये पार पडणारी अभिनयाची ही एकमेव राज्यस्तरीय स्पर्धा. फ्रायडेफिल्म्स अलिबाग आयोजित, कै. लेखक, दिग्दर्शक विजय बारसे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भरवण्यात येणारी राज्यस्तरीय एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धा सोमवार २० फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेचे हे सहावे वर्ष आहे. महाराष्ट्रातल्या ११ पेक्षा जास्त जिल्ह्यातून, आत्तापर्यंत जवळजवळ ३०० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग लाभलेली ही स्पर्धा आहे. यावर्षीही सोमवार २० फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे. एकपात्री आणि द्विपात्री अश्या दोन विभागात होणाऱ्या स्पर्धेसाठी, वय वर्ष १४ ते ४५ अशी वयोमर्यादा असेल. स्पर्धेच्या सादरीकरणाची भाषा मराठी असून एकपात्रीसाठी ५ ते ७ मिनिटे आणि द्विपात्रीसाठी ८ ते १० मिनिटे अशी वेळ मर्यादा असेल.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम अशी असेल. अलिबाग तथा रायगड मधील एकपात्री व द्विपात्री कलाकारांसाठी सुवर्णसंधी असलेल्या या स्पर्धेत जास्तीत जास्त अभिनेता/अभिनेत्रींनी आपला सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी – विवेक ९७६२२६०९७१, अश्रीता ७०३८५५७७४२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# सुपारी संघाच्या चेअरमनपदाची उद्या निवडणूक

**मुरुड : प्रतिनिधी**

पाच कोटी पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असणारा मुरुड तालुक्यातील नामंकित मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची निवडणूक ५ जानेवारी रोजी झाली होती. सहा जागा या बिनविरोध आल्या आहेत. त्यामुळे उर्वरित राहिलेल्या ११ जागांसाठी मतदान होऊन बागायतदारानी परिवर्तन पॅनलला बहुमत दिल्याने आता या गटाचा चेअरमन होणार आहे.

मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची निवडणूक सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनखाली झाली आहे. चेअरमन निवडीचा कार्यक्रम सुद्धा जाहीर करण्यात आला आहे. सोमवार १६ जानेवारी रोजी सकाळी ११ ते २ या कालावधीत चेअरमन निवडीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांनी पत्रकारांना दिली आहे. त्यामुळे आता चेरमन निवडीसाठी मोर्चेबांधणीला सुरुवात होणार आहे.



मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या चेअरमन पदासाठी बाबा दांडेकर यांचे नाव आघाडीवर असून बहुतेक या नावावर शिक्कमोर्तब होण्याची शक्यता दिसून येत आहे. सहकारी तत्वावर स्थापन झालेल्या या सुपारी संघामुळे स्थानिक लोकांना सुद्धा मोठा रोजगार प्राप्त झाला आहे.

मुरुड तालुक्यातील सुपारीचे पीक घेणाऱ्या बागायतदारांना चांगला भाव मिळवून देण्याचे काम सुपारी संघातर्फे होत असल्याने नवीन चेअरमन कोण होणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे तुर्भे, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विघमान कब्जेदार १. श्री महादु शंकर पाटील, २. श्री नामदेव धर्मा पाटील, ३. श्री मोतीराम धर्मा पाटील, ४. श्री तुळशीराम धर्मा पाटील, ५. श्री सखाराम धर्मा पाटील, ६. श्री गंगाराम धर्मा पाटील, ७. श्री पंढरीनाथ धर्मा पाटील, ८. श्री शशीकांत धर्मा पाटील, ९. श्री सागर धर्मा पाटील, १०. श्री काळुराम धर्मा पाटील, ११. श्रीमती नामुबाई मोतीराम गोरपेकर, १२. श्रीमती सरीता पंढरीनाथ सांगडे, १३. श्री पांडुरंग दगडु भोईर, १४. श्रीमती हिराबाई परशुराम म्हात्रे, १५. श्री रामदास दशरथ पाटील १६. श्रीमती कुसूम हिरामण ठाकुर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे तुर्भे, पनवेल महानगरपालीका, तहसिल व पोटतुकडी पनवेल जिल्हा रायगड व तुकडी रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| सर्व्हे नं गट नं | क्षेत्र: लावणी लायक हे. आर. प्रती | पोट खराबा हे. आर. प्रती | एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| ५८ | ०–३५–९० | ००–००–०० | ०–३५–९० पैकी ०–१८–०० | ३.१२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा, वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरिल मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालका बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल,**
**दिनांक :– १४/०१/२०२३**

**कार्यालयीन पत्ता**
बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार कार्यालया समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए;एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)


# पोलीस आणि परिवहन विभागाची गांधीगिरी

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचे गुलाबपुष्पाने स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस व परिवहन विभागातर्फे ११ ते १७ जानेवारी या कालावधीत रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी पोलीस व परिवहन विभागातर्फे सर्वत्र प्रमुख ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकीस्वार व चार चाकी वाहन चालकांविरोधात पोलीस व परिवहन विभागातर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येत आहे. भविष्यात नियमांचे उल्लंघन करू नका अशीही समज देण्यात येत आहे.

सध्या रस्त्यांवर होणाऱ्या अपघातात नियमांचे उल्लंघन झाल्याने अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यात दुचाकीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. यामुळे तरुण वर्गाचे मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याने चिंतेची बाब आहे. घरातील कमवता व्यक्ती गेल्याने कुटुंबावर मोठा आघात होतो.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनातर्फे अपघात रोखण्यासाठी विविध नियम बनवण्यात आले आहेत. शासनातर्फे वेळोवेळी विविध स्तरावर प्रयत्नही केले जात आहेत. पण सुसाट वाहने चालवण्याची क्रीज तरुणांमध्ये जास्त असते व त्यामुळेही



अपघात होत असल्याचे दिसून येत आहे.

शासनातर्फे नवीन वर्षाच्या प्रारंभीच यासाठी रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन केले जाते, यासाठी वाहन चालक यात ट्रक चालक, रिक्षा चालक, तसेच खाजगी वाहन चालकांना जनजागृतीसाठी परीसंवाद तसेच पथनाटयाचे आयोजन करण्यात येत असते. खोपोली पोलीस व परिवहन विभाग यांनीही रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील चौकात त्याचप्रमाणे खोपोली गावातील सिटी बस स्टॅन्ड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील चौकातही जनजागृतीचे आयोजन केले होते. केएमसी महाविद्यालयातही विद्यार्थ्यांसाठी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता, अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश कळसेकर यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

काल सायंकाळी जनजागृतीसाठी खोपोली पोलीस व परिवहन विभागाचे अधिकारी यांनी संयुक्तरित्या हेल्मेट न घालणाऱ्या त्याचप्रमाणे सीट बेल्टचे वापर न करणाऱ्या चार चाकी वाहनचालकांना थांबवून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच त्यांना नियमाचे पालन करण्याचेही आवाहन केले.

# नवी मुंबईत आत्मनिर्भर योजनेला गती

## ११० टक्के उद्दिष्टपूर्ती; १४,३३२ पथविक्रेत्यांना कर्ज मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान आत्मनिर्भर योजनेंतर्गत (पीएम स्वनिधी) कर्ज वितरण करण्यात नवी मुंबई महानगरपालिकेचे काम उत्तम झालेले असून विविध राष्ट्रीयकृत बँकांमार्फत १४,३३२ पथविक्रेत्यांना कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. महापालिका आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) अभिजित बांगर यांनी सातत्याने घेतलेल्या आढाव्यानुसार तसेच बँकांची विशेष बैठक घेऊन त्यांना दिलेल्या सूचनांनुसार ही कर्ज मंजूरी प्रक्रिया गतीमानतेने करण्यात आली.



नवी मुंबई महापालिकेच्या आठ विभाग कार्यालय क्षेत्रात २२,०३८ इतक्या मोठ्या संख्येने पथविक्रेत्यांचे अर्ज भरून घेण्यात आलेले असून त्यामधील १४,३३२ पथविक्रेत्यांचे कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. म्हणजेच शासनाने दिलेल्या लक्ष्याच्या ११० टक्के उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

यामध्ये आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांनी कार्यप्रणालीचे सुयोग्य नियंत्रण केले असून समाज विकास विभागाचे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांनी योजनेच्या अंमलबजावणीकडे काटेकोर लक्ष दिलेले आहे. समाजविकास अधिकारी सर्जेराव परांडे यांच्यासह सर्व आठही विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी समाज सेवक, समुह संघटक व आपल्या विभाग कार्यालयातील कर्मचारीवृंदाची मदत घेऊन अथक प्रयत्न करीत उद्दीष्टापेक्षा अधिक उत्तम कामगिरी केलेली आहे.

पंतप्रधान आत्मनिर्भर योजनेंतर्गत अधिकाधिक पथविक्रेत्यांना या योजनेचा लाभ घेता यावा यादृष्टीने समाज विकास विभागाने विभाग कार्यालयांच्या मदतीने योग्य नियोजन केले व लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. याची परिणीती म्हणजे ११० टक्के इतकी उद्दिष्टपूर्ती झाली असून यामध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज वितरणात महत्वाची कामगिरी केली आहे.

या योजनेंतर्गत पथमत १०,००० रुपये रक्कमेचे कर्ज देण्यात येत असून त्याची व्यवस्थित पूर्ण परतफेड झाल्यानंतर १८ महिन्यांसाठी २०,००० रुपये इतके द्वितीय कर्ज देण्यात येते. तसेच ते विहित कालावधीत फेडल्यानंतर ३६ महिन्यांसाठी ५०,००० रुपये इतके तृतीय कर्ज देण्यात येते. ज्या विभाग कार्यालय क्षेत्रात कमी अर्ज आले आहेत अशा ठिकाणी जनजागृती करण्याचे काम समाजविकास विभागामार्फत निरंतर सरू राहणार असून जास्तीत जास्त पथविक्रेत्यांना या योजनेचा लाभ मिळावा यादृष्टीने सातत्यपूर्ण प्रयत्न केले जाणार आहेत.

## पतंगांमुळे पक्ष्यांच्या जीवावर संक्रांत



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सर्वत्र पतंगबाजीला जोर चढत असून मांजाची सर्वत्र विक्री सुरू असल्याने पक्षांच्या जीवावर यंदाही संक्रांत येणार आहे. यामुळे पक्षीप्रेमीत नाराजी व्यक्त करत आहेत. जानेवारी या महिन्याची चाहुल लागताच अनेकांना वेड लागते ते पतंगाचे या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत अनेक प्रकारच्या पतंगाची विक्री होत असून पतंग मांजासह दाखल झाले आहेत, परंतु या पतंगबाजीसाठी वापरण्यात येणारा मांजा हा अनेकवेळा पक्षांच्या जीवावर बेतणारा ठरत असल्याचे दृश्य दरवर्षी पहावयास मिळत आहे. पतंगांच्या काटाकाटीमध्ये आपणच जिंकावे या उद्देशाने अनेकजण मांजाचा वापर करतात. यामुळे या धाग्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो.

या मकरसंक्रांतीच्या निमित्ताने बाजारात सध्या वेगवेगळ्या रंगाच्या, आकाराचे पतंग दाखल झाले आहेत. आकाशात पतंगांची गर्दी असते. संक्रांत एक दिवसांची असली तरी पतंगबाजी महिनाभर चालते. पतंग मांजासह झाडांच्या फांद्यात अथवा विजेच्या तारांमध्ये राहिल्यामुळे त्याच्या संपर्कात आल्यास पक्षी आणि छोटे प्राणी यामध्ये जायबंध होतात किंवा जीवाला मुकतात. हे टाळण्यासाठी पतंगबाजीची मजा ही लुटता आली पाहिजे आणि प्राणी व पक्षी यांचा जीवही वाचला पाहिजे असे दुहेरी उद्दिष्ट सध्या करण्यासाठी यंदा पतंग शौकिनांनी साध्या सुती धाग्याचा वापर करावा म्हणजे त्यांचा शौक पक्षांच्या जीवावर बेतणार नाही, असे आवाहन पक्षी आणि स्पर्धेत पक्षांना इजा पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

स्पर्धामध्ये आकाशात लांब गेलेल्या पतंगाच्या मांजामध्ये आकाशातून जाणारे पक्षी अडकून त्यांना इजा होण्याचा संभव असतो. त्यामुळे यंदा पतंग उडवितांना चायनीज अगर कोणताही धारदार मांजा न वापरता सुती दोरा वापरून पतंग उडवावेत, असा सल्ला पक्षीमित्र सल्ला देत आहे.

## नेरूळमध्ये स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतर्फे जी स्वच्छ सर्वेक्षण मोहीम राबवली गेली. नेरूळ विभागातही मोहिम झाली. या वेळी भाजप महिला मोर्चाच्या मंगल घरत तसेच अनेक रहिवाशी या मोहिमेत सहभागी झाले होते. या अनुषंगाने सेक्टर २८ नवीन, येथे नवी मुंबईतील स्वच्छता दूतांचा सन्मान म्हणून स्वच्छता अभियान राबवून कृतज्ञता व्यक्त केली. सर्व नागरिकांनी स्वच्छतेची शपथही घेतली.

या कार्यक्रमावेळी व्ही एस सेहगल, सुदाम शेवाळे, विजय खैरनार, राकेश घरत, सागर घनवट, ऋषिकेश गोडसे, पुनम नायर, प्रतिभा कणसे, सुष्मा जाधव, मेघा धुमाळ, सीमंतिनी घनवट, दुर्वेश धुमाळ, आत्मय घरत, वेदांत सुर्यवंशी, अंश नायर आदी उपस्थित होते.

## कामोठ्यातील मल:निसारण वाहिनी झाली दुरूस्त

### डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली होती मागणी

**पनवेल रामप्रहर वृत्त**


गेल्या काही महिन्यांपासून नादुरूस्त असलेली कामोठे सेक्टर १८मधील गणेश मंदिराजवळील मलःनिसारण वाहिनी दुरूस्त करण्यात आली आहे. माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी सिडकोला या समस्येचे निवेदन देत मागणी केली होती.

कामोठे सेक्टर १८ मधील गणेश मंदिराजवळील मलःनिसारण वाहिनी द चेंबर गेल्या काही महिन्यांपासून नादुरूस्त होती. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. याबाबत सिडको प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली होती. याबाबत सिडकोचे कामोठे कार्यकारी अभियंता वि. गो. पांडुळे यांनी, मलनि:सारण वाहिनी दुरुस्तीचा प्रस्ताव मंजूर झाला असून निविदा प्रक्रिया सुरू आहे, असे सांगितले होते. त्यानुसार मलःनिसारण वाहिनी दुरूस्त करण्यात आली.

## चोरलेले लाखो रुपयांचे लोखंडी पाइप हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

एजन्सींचे जाहीरात फलक बनविण्यासाठी ठेवलेले लाखो रुपये किमतीचे लोखंडी पाईप पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने हस्तगत केले आहे.



परवेज नाजीर खान यांची जाहिरात एजेन्सी असून त्यांनी जाहीरात फलक बनविण्यासाठी बीएड कॉलेजसमोरील रस्त्यावर, पनवेल बस स्टॅन्डजवळ ठेवलेले लोखंडी पाईप अज्ञात चोरट्याने चोरून नेले होते. याप्रकरणी परवेज खान यांनी शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंदवला.

शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार रवींद्र राऊत, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, नाईक रवींद्र पारधी, विनोद देशमुख, शिपाई प्रसाद घरत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने पाच लाख रुपये किमतीचे दोन पाईप व दोन लाख रुपये किमतीचा एक पाईप असे एकूण सात लाख रुपये किमतीचे लोखंडी पाईप हस्तगत केले आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील नेरूळ येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी नवी मुंबईच्या गुन्हे कक्ष ३ च्या पथकाने शिताफीने तपास केला असता धक्कादायक प्रकार समोर आला असून हा अत्याचार करणारा इसम हा दुसरा तिसरा कोणी नसून एक नवी मुंबई पोलीस दलातील बडतर्फ पोलीस असल्याचे समोर आले आहे.



या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून कक्ष ३ गुन्हे शाखेकडून वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी ह्यांनी गुन्हा घडल्यापासून समांतर तपास सुरू होता. आरोपी संतोष नरोडे यांच्यावर अपहरणाचा गुन्हा एनआरआय पोलीस ठाण्यात दाखल झाला असता त्याला अटक करण्यात आली होती. काही दिवसांपूर्वी त्याची जामीनावर सुटका करण्यात आली होती. त्याच नराधमाने नेरूळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीला धमकावून तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हा नराधम अनेक दिवसांपासून फरार होता, मात्र नेरूळ पोलिसांनी गुन्हे अन्वेषण तीन विभागाच्या पोलिसांनी अनेक दिवस घटनास्थळ आणि इतर ठिकाणचे जवळपास ५०च्या वर सीसीटीव्ही कॅमेरे तपासले आणि शेवटी साक्षीदार व गुप्त बातमीदाराच्या माहितीप्रमाणे आरोपींची ओळख पटली.

एका गुप्त माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक ईशान खरोटे, सागर पवार व अंमलदार यासर्वांनी अंधेरीतून या नराधमाला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता संबंधित गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याचे समोर आले. दरम्यान, आरोपीला अटक करून १६ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## नवी मुंबईत प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम तीव्र

### ऐरोलीत तीन दुकानांमधून सात किलो साठा जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुक्त नवी मुंबईचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा तीव्र करण्यात आल्या असून महापालिका आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) अभिजित बांगर यांच्या निर्देशानुसार सर्वच विभागांमध्ये मोहीमांना गती देण्यात आलेली आहे.



यास अनुसरून घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या नियंत्रणाखाली, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे व परिमंडळ २ चे उप मुख्य स्वच्छता अधिकारी विनायक जुईकर यांनी स्वच्छता अधिकारी श्री. सुभाष म्हसे व स्वच्छता निरीक्षकांसह ऐरोली विभागात अचानक तपासणी सुरू केली.

या तपासणीमध्ये तीन दुकानांमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळून आल्याने त्यांच्याकडून प्रत्येकी ५ हजार प्रमाणे १५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली त्याचप्रमाणे ७ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. अशाप्रकारच्या धडक मोहीमा सर्वच विभागांमध्ये सुरू आहेत.

## बेकायदा दारूच्या साठ्यावर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत बेकायदेशीररीत्या विनापरवाना देशी दारूचा साठा जवळ बाळगून त्याची विक्री केल्याप्रकरणी तळोजा पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध कारवाई केली आहे.

तालुक्यातील पडघे गावाच्या हद्दीत एक व्यक्ती त्याच्याजवळ देशी दारूचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे यांना मिळाली. त्यानुसार विशेष पथकाने छापा टाकून जवळपास ३०१० रुपये किमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करून त्याच्याविरोधात कारवाई केली आहे.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

राजभाषा मराठीचे संवर्धन व्हावे व तिचा जास्तीत जास्त वापर व्हावा यादृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या वतीने १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत असून नवी मुंबई महापालिकेच्या वतीनेही मराठी भाषेचा गौरव वाढवित मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करणारे तसेच कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर व्हावा यादृष्टीने महापालिका आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

यामध्ये १७ जानेवारी रोजी, सकाळी ११ वाजता कवी अशोक नायगावकर यांचे 'मायबोली मराठी' या विषयावर व्याख्यान आणि त्यांच्या प्रसिध्द कवितांचे सादरीकरण होणार आहे. १९ जानेवारी रोजी भाषा अभ्यासक वैभव चाळके 'शुध्दलेखनाच्या दिशेने.' या विषयांतर्गत सकाळी ११ वाजता शुध्दलेखनाचे शासकीय नियम व लेखन या विषयावर अधिकारी, कर्मचारी यांचेशी सुसंवाद साधणार आहेत.



२० जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता 'कविता डॉट कॉम' ही नवी मुंबईतील कवींची जिंदादील काव्यमैफल होणार असून त्यामध्ये कवी प्रा. रवींद्र पाटील, जितेंद्र लाड, वैभव व-हाडी, शंकर गोपाळे, नारायण लांडगे पाटील, रुद्राक्ष पातारे आणि डॉ. कैलास गायकवाड सहभागी होणार आहेत. २४ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता साहित्यिक, कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम – 'जीए-स्मरणखुणा' आयोजित करण्यात आला असून त्यामध्ये प्रा. वृषाली मगदूम, डॉ. मृण्मयी भजक आणि मिनाक्षी पाटील या जीएंच्या आठवणींना उजाळा देणार आहेत. तसेच त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये कथन करीत काही कथांचे अभिवाचन करणार आहेत.

२७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता नमुंमपा अधिकारी – कर्मचारीवृंदांची 'स्वकाव्यवाचन स्पर्धा' आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना स्वत:ची एकच स्वरचित कविता सादर करता येईल. ही स्पर्धा झाल्यानंतर लगेचच या स्पर्धेचा तसेच निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारभ संपन्न होणार आहे. याशिवाय 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त, 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत नमुंमपा अधिकारी – कर्मचारी यांचेकरिता 'निबंध स्पर्धा' आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धे करिता (१) 'पर्यावरण संवर्धन – माझी संकल्पना' किंवा (२) 'जागर अभिजात मराठीचा' यापैकी एका विषयावर कमाल २००० शब्द मर्यादेत आपले निबंध कागदाच्या एका बाजूला लिहून (पाठपोट नाही) सादर करावयाचे आहेत. नमुंमपा अधिकारी-कर्मचारी यांनी आपले निबंध २० जानेवारी २०२३पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रशासन विभागाचे अधिक्षक अरविंद उरसळ (८३६९६४७४५५) यांचेकडे जमा करावयाचे आहेत.

काव्य स्पर्धेकरिता आपली नाव नोंदणी २४ जानेवारी २०२३ पर्यंत अभय जाधव (७६७८००४५०२), अरविंद उरसळ (८३६९६४७४५५), रवी जाधव (९९२०३७८५७४) यांचेकडे करणे आवश्यक आहे.

नवी मुंबई हे सांस्कृतिक शहर म्हणून नावारुपाला येत असताना महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारीवृंदामध्येही सांस्कृतिकतेची जोपसना व्हावी व यातून मराठी भाषेचा दैनंदिन कामकाजात वापर वाढून गौरव व्हावा यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका अतिशय उत्साहाने हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करीत आहे.

## मोठी जुई शाळेत पौष्टिक तृणधान्य पदार्थ महोत्सव

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य कृषी विभाग, अंतर्गत रायगड जिल्हा परिषद व उरण पंचायत समितीच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा मोठी जुई येथे शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या सहाय्याने तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, वरी, नाचणी व राजगिरा असे विविध प्रकारच्या तृणधान्याचे पौष्टिक पदार्थ बनवून आणले होते.




यामध्ये भाकरी, खीर, लाडू, उपमा, शिरा, लापसी, मोदक, पुरी, चपाती, इडली, अप्पे, भात, चपाती, केक, पापड, कुरडया, वड्या इ. सर्व पदार्थांचे प्रदर्शन केळीच्या पानावर भरविण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी पर्यवेक्षक कोप्रोली शिवाजी लोहकरे, अश्विनी भोईर, शितल ढाकणे, निखिल देशमुख, तृप्ती बंडा आदींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक संजय होळकर यांनी उपस्थित मान्यवरांचे रोपवाटिका देउन स्वागत करून प्रास्ताविक केले.

विद्यार्थ्यांना तृणधान्य प्रकार, शरीराला गरज, महत्त्व व कार्यवाही, आपला भौगोलिक परिसर इत्यादीबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर या महोत्सवात अतिशय मेहनत घेऊन जास्तीत जास्त तृणधान्याचा वापर करून पदार्थ बनविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. चार क्रमांक काढण्यात आले. त्यामध्ये प्रथम अक्षरा कांतीलाल पाटील (सातवी), द्वितीय स्वराज कांतीलाल पाटील (तिसरी), तृतीय इशांत प्रितम पाटील (सहावी), चौथी इशिता प्रकाश भोईर (चौथी) यांनी क्रमांक पटकाविले.

या वेळी शालेय विद्यार्थी, महिला बचत गट व पालकांनी महोत्सवाला चांगला प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे निवेदन दर्शन पाटील यांनी तर आभार यतीन म्हात्रे यांनी मानले. या महोत्सवात संदीप गावंड, शर्मिला पाटील, ज्योती बामणकर, गुलाबताई कोळी, काजल पाटील, करूणा भोईर व महिला बचतगट सदस्य उपस्थित होत्या.

# मकरसंक्रातीनिमित्त सुगडांना मागणी

## नातेसंबंध दृढ करणारा आनंदोत्सव



**माणगाव : प्रतिनिधी**

हिवाळा सुरू झाला की वेध लागतात ते मकरसंक्रातीचे, नवीन उत्साह व नाते संबंध निर्माण करणारा व जतन करणारा हा सण त्यातील विशेष असणाऱ्या विविधांगी प्रथानी ओळखला जातो. तर नवविवाहित महिलांसाठी हा सण खास असतो.

दरवर्षी १५ जानेवारीला साजरा होणारा मकरसंक्रातीचे सण तिळगुळ, पुरणपोळी, पतंग आणि सुगड पूजन अशा विविध प्रथांसाठी प्रसिद्ध आहे.नातेसंबंध दृढ करणारा हा उत्सव आबालवृद्ध सर्वासाठीच आनंदाची पर्वणी असतो. सुवासिनी महिलांसाठी आनंदाची उधळण करणारा हा सण त्यातील सुगड पूजनासाठी प्रसिद्ध आहे. जानेवारी महिन्यात शेतात तयार होणारे पीक सुगड पूजन करून एकमेकींना देवून या दिवशी सुवासिनी महिला, दिर्घआयु व सुखी संसाराची मनोकामना करतात.

या दिवशी कुंभाराकडील मातीची लहान मडकी विकत घेउन या मडक्यात शेतातील धान्य हरभरा, पावटे इत्यादी पीके पाच मडक्यात भरली जातात. या मडक्यांचे सुवासिनी महिला पाटावर ठेवून पूजन करतात. यातील तीन सुगड पूजन झाल्यावर सुवासिनींना दिले जातात. एक सुगड तुळशीला दिला जातो तर एक सुगड स्वतःसाठी ठेवला जातो. अशा या आगळ्यावेगळ्या पूजनासाठी माणगाव, इंदापूर, गोरेगाव येथील बाजारपेठेत कुंभारवाड्यातून मोठ्या प्रमाणात सुगड विक्रीसाठी आले असून संक्रातीचा सण असल्याने महिलांनी मोठ्या प्रमाणात सुगड खरेदी केली आहेत.

गेल्या वर्षी ज्या किमतीने म्हणजेच दहा रुपयांना सुगड मिळत होते तसेच यावर्षी किंमतीत कोणताही बदल नसून पन्नास रुपयांना पाच सुगड मिळत आहेत. लहान मोठ्या आकारातील सुगडना चांगली मागणी असून यानिमित्ताने कुंभारवाडे गजबजले असून बाजारातून सुगड विक्री करण्यासाठी विक्रेते येत आहेत.

> **सुगड विक्रीतून चांगला व्यवसाय उपलब्ध होत आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही सुगडना चांगली मागणी आहे. ५० रुपयांना ५ सुगड उपलब्ध आहेत. या वर्षी लांबलेल्या पावसाने उत्पादन व विक्रीवर थोडा परिणाम झाला. मात्र पाऊस थांबल्यानंतर मोठ्या प्रमाणात सुगड बनविले.**
> **– सुमित देवरेकर, सुगड विक्रेता,इंदापूर**

### सुगड म्हणजे नेमकं काय?

**'सुघट' म्हणजे शेती मालांनी भरलेला घट. नंतरच्या काळात त्याला 'सुगड' म्हणायला लागले. लाल आणि काळ्या रंगाचे छोटे माठ म्हणजे घट. पूर्वीच्या काळात मातीचे हे घट नव्हते. त्यावेळी घरातील लहान गडव्यात हे घट मांडले जातं होते. शेतात पिकलेल्या धान्याला घटात भरून मकर संक्रांतीच्या दिवशी पूजले जाते.**

# एसबीआय लोणेरे शाखा व्यवस्थापकाचा मृत्यू

## माणगावजवळ वाहनाची दुचाकीला धडक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावपासून सहा किमी अंतरावर असणाऱ्या तळेगावच्या हद्दीत हॉटेल सुयश जवळ मुंबई–गोवा महामार्गावर अज्ञात वाहनाची मोटार सायकलला धडक लागल्याने झालेल्या अपघातात मोटार सायकल चालक एसबीआय बँक लोणेरे शाखेचे शाखा व्यवस्थापक यांचा मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी (दि.१३) घडला. घटनेची माहिती गौरव शंकर लासूरकर (वय–२८) रा. ढालघर फाटा, अशनाझ कॉम्प्लेक्स ता. माणगाव यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात दिली.

गोरेगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, अपघातात मृत झालेले एसबीआय बँक लोणेरे शाखेचे व्यवस्थापक अमित अशोक कुमार (वय–३८) रा. ढालघर फाटा, अशनाझ कॉम्प्लेक्स ता.माणगाव मूळ रा.गहीबाजार, राज्य उत्तर प्रदेश हे लोणेरे ते ढालघर अशी त्यांची मोटार सायकल क्रमांक एम.एच.१२ जीटी ७७३ ने प्रवास करीत असताना अपघात ठिकाणी आल्यावर अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाने मुंबई बाजूकडून अथवा महाड बाजूकडून येत– जात असताना मोटार सायकलला जोरदार धडक दिल्याने अपघात घडला.

या अपघातात एसबीआय बँक लोणेरे शाखेचे व्यवस्थापक अमित अशोक कुमार यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यामध्ये त्यांचा मृत्यू होऊन मोटारसायकलचे नुकसान झाले. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अपघाताचा अधिक तपास गोरेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण नावले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस फौजदार आर. डी. फाळके करीत आहेत.

# रोहा महाविद्यालयात जिल्हास्तरीय नेतृत्वगुण विकास शिबिर



**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या विद्यमाने नेतृत्वगुण विकास शिबिर पार पडले. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालय विकास समतीचे सदस्य लिलाधार थोरवे यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

या शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यातील को.ए.सो. डॉ. सी. डी. महाविद्यालय, सेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय कोलाड, एम.बी.मोरे महिला महाविद्यालय धाटाव, जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग, एल.एस. पी. एम.महाविद्यालय चोंढी, पी.एन. पी. महाविद्यालय वेश्वि, को.ए.सो. लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय पेझरी, को.ए.सो.आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय नागोठणे, डी. जी.तटकरे महाविद्यालय तळा, जी.एम. वेदक विज्ञान महाविद्यालय तळा, दोशी वकील महाविद्यालय गोरेगाव, सुंदराराव मोरे महाविद्यालय पोलादपूर, टिकमभाई मेहता महाविद्यालय माणगांव, वसंतराव नाईक महाविद्यालय, मुरुड,वसंतराव नाईक महाविद्यालय, म्हसळा, गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय श्रीवर्धन, अंजुमनइस्लाम महाविद्यालय, मुरुड, एम.एम. जगताप महाविद्यालय, महाड, हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट महाविद्यालय महाड, हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट रात्र महाविद्यालय महाड या २१ महाविद्यालयातील ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

शिबिरात प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांचे राष्ट्रीय सेवा योजना उद्देश व इतिहास, डॉ. प्रवीण गायकवाड यांचे संवाद कौशल्य, डॉ.राजाराम थोरात यांचे सामुदायिक कार्यातील सामाजिक समस्या, अनंत थोरात यांचे योग साधनेचे महत्व, प्रा. तुळशीदास मोकल यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे उपक्रम, प्रा.सुकुमार पाटील यांचे निवासी शिबिरातील उपक्रम, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे ओ.एस.डी. प्रा. सुशिल शिंदे यांचे, राष्ट्रीय सेवा योजनेचे उपक्रम व व्यवस्थापन, जयवंत गायकवाड यांचे ग्रामीण विकासातील युवकांची भूमिका, डॉ. दिवाकर कदम यांचे व्यक्तिमत्त्व विकास डॉ. सम्राट जाधव यांचे वेळेचे नियोजन व व्यवस्थापन, डॉ. साजिद शेख यांचे अहवाल लेखन व संपादन, नितीन जोशी यांचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाच्या यशातील लिडरची भूमिका या वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने झाली.

समारोप प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या उपस्थितीत झाला. समारोप कार्यक्रमात उपस्थितांना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

## कामे मार्गी लागल्याने माथेरानकरांत समाधान

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमधील अनेक वर्षांपासून रेंगाळलेली रस्त्यांची कामे एमएमआरडीएच्या माध्यमातून युद्धपातळीवर सुरू असल्याने स्थानिक आणि व्यापाऱ्यांमध्ने समाधान व्यक्त होत आहे. मुख्य रस्त्यावर असणाऱ्या रेस्टॉरंट तसेच अन्य खाद्य पदार्थ दुकाने, चपलांच्या दुकानात धुळीच्या त्रासाने अक्षरशः व्यापारी वर्गासह नागरिक सुध्दा त्रस्त झाले होते.ओबडधोबड समपातळी नसलेल्या रस्त्यावर चालताना अनेकांना पायदुखी, कंबरदुखी सारख्या आजारांनी ग्रासले होते. परंतु सध्या सुरू असलेल्या क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांमुळे धूळविरहित रस्त्यावर चालताना एक वेगळाच आनंद पर्यटकांना अनुभवायला मिळत आहे.



**माणगाव : येथील आर्या परेश गांधी या विद्यार्थिनीने जुलै २०२२मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्ती प्राप्त केली. याबद्दल तिचे अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीसाठी नगरपंचायतीचे स्वच्छता सभापती अजित तारळेकर व ॲड. मयुरा तारळेकर यांनी शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख)

# लोकगीत स्पर्धेत पीएसआय बालाजी जाधव यांचे यश



**पाली : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवेत असलेले महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक व सुधागडमधील रासल गावचे सुपुत्र बालाजी जाधव यांनी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र कार्यालयातर्फे आयोजित लोकगीतांतून लोकशाहीचा जागर २०२२ या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत त्यांनी एकल गटात उत्तेजनार्थ क्रमांकाचे बक्षीस मिळवून रायगड पोलीस दलात मानाचा तुरा रोवला आहे.

याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून पोलीस उपनिरीक्षक बालाजी जाधव यांचे पत्राद्वारे अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जाधव यांना रोख रक्कम ५०० रुपयांचे पारितोषिक देण्यात आले आहे.

पोलीस उपनिरीक्षक बालाजी जाधव यांनी पोलीस दलात सेवा देण्याबरोबरच गायनाची आवड सुद्धा जोपासली आहे. त्यांच्या सुमधुर आवाजाने लोकांना ते मंत्रमुग्ध करून टाकतात. लोकगीते, कोळीगीते, भक्तिगीते, प्रबोधनात्मक गाणी, भीमगिते, शिवरायांचे पोवाडे याचबरोबर मराठी सिनेमातील गाणी सुद्धा त्यांनी गायली आहेत. पोलीस दलात सेवा देत त्यांनी हजारो गाणी गायली. त्यांची अनेक गाणी सुपरहिट देखील झाली आहेत.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, निशा भगत यासारख्या अनेक दिग्गज गायकांबरोबर त्यांनी गाणी गायली आहेत. त्यांची हजारो गाणी ही युट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहेत. बालाजी जाधव यांचा गायनाचा वारसा त्यांचे चिरंजीव सुमेध जाधव यांनी जोपासला आहे. सध्या जाधव हे खालापूर पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

# तळाघर येथे आरोग्य शिबिराला प्रतिसाद



**धाटाव : प्रतिनिधी**

दीपक फाउंडेशन व दीपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्या वतीने पंतप्रधान जन आरोग्य योजनेअंतर्गत रोहा तालुक्यातील तळाघर येथे ग्रामपंचायत कार्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर गुरुवारी (दि. १३) उत्साहात साजरे करण्यात आले.

दीपक फाउंडेशन रोहा व दीपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्यावतीने ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेला संगाध प्रकल्पातंर्गत कार्यक्रमाचे आयोजन ठिकठिकाणी करण्यात येत आहेत. हा प्रकल्प मोठा लाभदायक ठरत असून या प्रकल्पातंर्गत तालुक्यातील ४६ गावे, वाड्या व वस्त्यांवर शासकीय योजनेची माहिती व लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायतस्तरावर धन सुविधा केंद्राची स्थापन करून प्रबोधनाचे कार्य केले जात आहे. तसेच गावागावात विविध शासकीय योजनाची माहिती शिबिरांचे आयोजन केले जात आहे.त्याचाच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली. शिबिरांचा ४४ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. प्रकल्प सामान्यप्रकल्प प्रवीण ठोसर व सुपरवायझरप्रकल्प प्रवीण ठोसर व सुपरवायझर गुलाब सुतार फॅसिलेटर दिव्या भगत, शिल्पा सुतार यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी तळाघर ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तळाघर ग्रामपंचायत यांनी केलेल्या मोलाचे सहकार्याबद्दल दीपक फाउंडेशन व दीपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्यावतीने त्यांचे आभार व्यक्त केले.

# महाड येथील महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात




**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स आणि हिरवळ रात्र महाविद्यालय महाड यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते २६ डिसेंबर या कालावधीत महाविद्यालयात विविध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमधील खेळाडू वृत्ती जोपासण्यासाठी महाविद्यालयात बॅडमिंटन, चेस, कॅरम, व्हॉलीबॉल, कबड्डी या सारख्या विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना वाव देण्याकरिता महाविद्यालयात कोलाज, पेंटिंग, फूड, फ्रूट, फ्लॉवर डेकोरेशन, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील नृत्य कला, गायन कला यांना प्रोत्साहन देण्यासाठी तरंग सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धा व कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले.

तरंग या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर भाई धारिया, जयवंराव देशमुख सरपंच वरंध, पराग प्रभुदेसाई ( ए.जी.एम.) मायक्रोस्कॅन, दानिश मुजावर मायक्रोस्कॅन सदस्य, संतोष भाई बुटाला, सेक्रेटरी हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, सुदेश कदम, प्राचार्य कॉलेज ऑफ सीएसआयटी, विद्या गुजर प्राचार्या ज्युनिअर कॉलेज उपस्थित होते. यावेळी इंटरनेट योजनेचे उद्घाटन तरंग कार्यक्रमाचे औचित्य साधून करण्यात आले.

# वाणदे येथे हत्ती गवत लागवड शुभारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील वाणदे या गावी मुरुड स्वप्नपूर्ती प्रोड्युसर कंपनीतर्फे एमसीएल अंतर्गत शिघ्रे येथील उद्योजक अमोल काशीनाथ पाटील यांच्या जागेत एमकोल या सीएनजी प्रदूषण मुक्त गॅससाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या हत्ती गवत लागवडीचा शुभारंभ कंपनीचे प्राईम बिडीए शैलेश म्हात्रे आणि माजी सरपंच अजित कासार यांच्या हस्ते तथा कंपनीचे मुख्य सीईओ श्रावण माने यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच झाला.

याप्रसंगी प्राईम बिडीए शैलेश म्हात्रे म्हणाले, मुरुड तालुक्यात कंपनीने या प्रकल्पासाठी १२ एकर जागा घेतली असून हत्ती गवत, पालापाचोळा, पेंडा, तूस, झाप आदी कच्चा माल ठिकाणी अशी युनिट स्थापन कंपनीच्या सभासद शेतकऱ्यांकडून खरेदी केला जाणार असून येथेच प्रोसेस केली जाणार आहे.

संचालक तुकाराम पाटील यांनी आपल्या भाषणात नमूद केले कि,स्वप्नपूर्ती कंपनीमुळे स्थानिक शेतकऱ्यांची आर्थिक परस्थिती सुधारण्यास मदत होऊन शेतकरी सधन होणार आहे. या कंपनीमधील सभासदांच्या मुला–मुलींना नोकऱ्या, शिक्षण, आरोग्य, क्रीडा क्षेत्राला देखील सहकार्य केले जाणार आहे. अशी माहिती यावेळी तुकाराम पाटील यांनी दिली.माजी सरपंच अजीत कासार म्हणाले, या कंपनीच्या माध्यमातून निर्माण होणारे प्रदूषण मुक्त उत्पादन मानवासाठी अत्यन्त उपयुक्त आणि शेतकऱ्यांना मोठा आर्थिक मदतीचा हात देणारे ठरणार आहे.

या प्रसंगी कंपनीचे सेक्रेटरी नामदेव भोईर, संचालक रवींद्र पोतनीस, संचालक अरविंद भोपी, संचालक तुकाराम पाटील, अजित कासार, दिलीप केने, प्रमोद गुरव, कलावती पाटील, जयंत कासार, अमोल पाटील, सखाराम गायकर, मुंबईकर गुरुजी, दामोदर वारगे, ज्ञानेश फलेभाई, अमित ठाकूर, कृष्णा मिसाळ, घनश्याम श्रीवर्धनकर, शिवानी जगताप, राजश्री गायकर, चंद्रकांत बेडेकर, कल्पेश बुलू, इंदिरा ठाकूर असे अनेक शेतकरी उपस्थित होते.



# हिरवळ महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी




**माणगाव : प्रतिनिधी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यातून स्फूर्ती देण्यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड व हिरवळ रात्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, उ्ब्डए व महिला विकास कक्ष विभागातर्फे महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर उजाळा देऊन विद्यार्थ्यांना त्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी महिला सक्षमीकरण या विषयावर नाटक सादरीकरण केले. महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष बी. कॉम. ची विद्यार्थिनी ईशा पार्टे हिने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर ओवी सादर केली.

यानंतर विद्यार्थ्यांनी धारिया पेट्रोल पंप चांभारखिंड व छत्रपती शिवाजी महाराज चौक, महाड येथे पथनाट्य सादरीकरण करून समाजात जनजागृती केली.

हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर भाई धारिया, संचालिका सोनाली धारिया व हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट च्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांच्या प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांमध्ये व समजामध्ये विविध विषयावर जनजागृती करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

# हॉकी वर्ल्डकपमध्ये भारताची विजयी सलामी

## आज बलाढ्य इंग्लंडशी लढत



**राऊरकेला (ओडिशा) : वृत्तसंस्था**

ओडिशामधील राऊरकेला येथे सुरू असलेल्या हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारताने विजयाने सुरुवात केली आहे. सलामीच्या पहिल्या सामन्यात भारतीय संघाने स्पेनचा २-० असा पराभव केला. भारताकडून या सामन्यात अमित रोहिदास आणि हार्दिक सिंगने गोल केले. भारताचा दुसरा सामना रविवारी (दि. १५) बलाढ्य इंग्लंडशी होणार आहे.

पहिल्या क्वार्टरमध्ये ११व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला होता. यावर टीम इंडिया गोल करू शकली नाही. यानंतर पुढच्याच मिनिटाला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. यावर अमित रोहिदासने शानदार गोल केला. या विश्वचषकात भारताचा हा पहिलाच गोल होता. १३व्या मिनिटाला टीम इंडियाला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण त्याचे रूपांतर संघ गोलमध्ये करू शकला नाही.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये स्पेनला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला. स्पेनच्या संघाला २४व्या मिनिटाला गोल करता आला नाही. भारताचा गोलरक्षक क्रिशन पाठकने अप्रतिम बचाव केला. त्याने स्टिकने चेंडूची दिशा बदलली. भारताने २६व्या मिनिटाला दुसरा गोल केला. हार्दिक सिंगने चार खेळाडूंना चकमा देत जबरदस्त गोल केला. या विश्वचषकात भारताचा हा पहिला मैदानी गोल होता. हार्दिकने टीम इंडियाला २-० अशी आघाडी मिळवून दिली.

सामन्याच्या तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताला गोल करण्याची सुवर्णसंधी मिळाली. स्पेनच्या खेळाडूंच्या चुकीमुळे ३२व्या मिनिटाला टीम इंडियाला पेनल्टी स्ट्रोक मिळाला. यावर प्रत्येकाला गोलची अपेक्षा होती. कर्णधार हरमनप्रीत सिंग स्ट्रोक घेण्यासाठी मैदानाबाहेर आला, पण त्याला स्पॅनिश गोलकीपरच्या पुढे जाण्याचा मार्ग सापडला नाही. चेंडू गोलरेषा ओलांडू शकला नाही आणि टीम इंडियाला तिसरा गोल करता आला नाही. दुसरीकडे स्पेन संघ एकही गोल करू शकला नाही आणि भारताने सामना २-०ने जिंकला. अमित रोहिदासला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

सलामीच्या विजयासह भारताने विश्वचषकाची सकारात्मक सुरुवात केली आहे. संघाला आणखी सुधारणेस वाव आहे. भारताचा दुसरा सामना रविवारी बलाढ्य इंग्लंडशी होईल. इंग्लंडने त्यांच्या पहिल्या सामन्यात वेल्सचा ५-० असा पराभव केला होता.



### टाईम्स ढाल क्रिकेट स्पर्धा

# नवी मुंबई पोलीस क्रिकेट संघ उपउपांत्य फेरीत

**नवी मुंबई : बातमीदार**

आशिया खंडातील सर्वांत जुनी आणि प्रसिद्ध अशा टाईम्स ढाल कार्यालयीन क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबई पोलीस क्रिकेट क्लबने क गटात खेळताना बलाढ्य संघांना हरवून उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

टाईम्स ढाल कार्यालयीन क्रिकेट स्पर्धेमध्ये क गटात १६ संघ असून त्यात मुंबई पोलीस जिमखाना, युनियन बँक, रिझर्व बँक, बँक ऑफ इंडिया, हिंदुस्तान पेट्रोलियम, मुंबई महापालिका अशा बलाढ्य आणि पूर्वानुभव असलेल्या संघांचा समावेश आहे. या वर्षी संघाने उपउपांत्य फेरीत प्रवेश केला असून त्यात कर्णधार पोलीस हवालदार अरुण घोगरे व उपकर्णधार पोलीस हवालदार अमित वाडकर यांनी लक्षवेधी कामगिरी केली आहे. ११ नोव्हेंबर २०११ रोजी तत्कालीन पोलीस आयुवत अहमद जावेद यांच्या संकल्पनेतून हा संघ तयार करण्यात आला होता.

# रिले स्पर्धेत रायगडच्या मुलींचे यश



**उरण : वार्ताहर**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या वतीने पालघर येथे आयोजित विभागस्तरीय क्रीडा स्पर्धेत धावण्याच्या रिले प्रकारामध्ये रायगड जिल्ह्यातील मुलींनी यश प्राप्त केले. त्यांचे कौतुक होत आहे.

मुलींच्या १९ वर्ष वयोगटात नवी मुंबई महापालिकेच्या मुलींनी प्रथम क्रमांक पटकाविला. ठाणे ग्रामीण भागातील मुलींनी द्वितीय, तर रायगड जिल्ह्या-तील मुलींनी तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या तिन्ही गटांतील स्पर्धकांना आकर्षक पदक व प्रमाणपत्र देण्यात आले. विशेष म्हणजे उरण तालुक्यातील चिरनेर येथील चिन्मई किशोर भगत हिने या रिले स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. तर स्पर्धेत तिच्यासोबत रिंकल कैलास कोळी, मनश्री धनंजय ठाकूर, सिद्धी अतुल सिंग व पूर्वा किशोर म्हात्रे यांचा समावेश होता. यशस्वी स्पर्धकांना प्रशिक्षिका अर्चना भोईर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल चिन्मई भगत व तिच्या सहकारी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत आहे. चिरनेर ग्रामपंचायतीनेही तिच्या अभिनंदनचा ठराव घेतला आहे.

## आजपासून नवी मुंबईत मल्लखांब स्पर्धा रंगणार

**नवी मुंबई : बातमीदार**


श्री अंबिका योग कुटीर आणि मल्लखांब असोसिएशन नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मल्लखांब या खेळाच्या प्रसार व प्रचार करण्याच्या हेतूने नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर सेक्टर ९ येथे प्रथमच निमंत्रित नवोदित पुरलेला मल्लखांब, रोप मल्लखांब, जिम्नॅस्टिक्स (फ्लोअर एक्सरसाईज) आणि सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

स्पर्धेत नवी मुंबईतील ६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेचे उद्घाटन रविवारी (दि. १५) सकाळी ८.४५ वाजता होणार असून स्पर्धा २२ तारखेपर्यंत चालणार असल्याचे स्पर्धेचे आयोजक बेलापूर येथील श्री अंबिका योग कुटीरचे संचालक रवींद्र जाधव, स्पर्धा प्रमुख लतेश पडवळ, नवी मुंबई मल्लखांब असोसिएशनचे मानद सचिव संजय रायचुरकर यांनी माहिती देताना सांगितले.

# ज्युनिअर मुलांची निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा उरणला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे ज्युनिअर (१९ वर्षांखालील) मुलांची निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा उरण येथे २३ जानेवारीपासून खेळविण्यात येणार आहे. उरण क्रिकेट अ‍ॅण्ड स्पोर्ट्स असोसिएशनच्या मैदानावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ४० षटकांची साखळी व बाद पद्धतीने स्पर्धा खेळवली जाईल, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.



१ सप्टेंबर २००४ किंवा त्यानंतर जन्मलेले रायगड जिल्ह्यातील रहिवासी असलेले खेळाडू या स्पर्धेत खेळण्यास पत्र असतील. ज्या रायगड जिल्ह्यातील संघांना या स्पर्धेत भाग घ्यावयचा असेल, त्यांनी स्पर्धा शुल्क ११,८०० रुपये १८ जानेवारीपर्यंत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या बँक खात्यात (बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र. ६०२६४४९५३३६, आयएफएससी एमएएचबी ०००१५९७) जमा करावेत.

स्पर्धेत खेळणाऱ्या १५ खेळाडूंची संघ यादी, सोबत सर्व १५ खेळाडूचे आधार कार्ड प्रत, खेळाडूंच्या वयाचा दाखला, स्पर्धा शुल्क भरल्याची माहिती, संघाची आवश्यक कागदपत्रे १९ जानेवारीपर्यंत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव प्रशांत ओक पेण किंवा districtcricket.raigad@gmail.com या ई-मेलवर पाठवावी. ही माहिती जमा केल्यानंतरच संघाचा स्पर्धेतील सहभाग निश्चित होईल. स्पर्धेत सहभाग निश्चित झालेल्या संघांनाच स्पर्धेचे वेळापत्रक व नियमावली पाठवण्यात येईल.

अधिक माहितीसाठी प्रशांत ओक (९८२२४२२६७६), प्रकाश पावसकर (७९७७०१२७४२), किरीट पाटील (८८९८०१५२८५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त चिटणीस प्रशांत ओक यांनी केले आहे.

# न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकांसाठी भारतीय संघात युवा खेळाडूंना प्राधान्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड संघात होणाऱ्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर करण्यात आला. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या कसोटी मालिकेतील पहिल्या दोन सामन्यासाठीदेखील टीम इंडियाची घोषणा झाली आहे. यामध्ये काही युवा खेळाडूंचे पुनरागमन झाले आहे.

भारत आणि न्यूझीलंड संघातील वनडे मालिकेत तीन सामने खेळले जाणार आहेत. या मालिकेला १८ जानेवारीपासून होईल. संघाची धुरा रोहित शर्माकडे असणार आहे. त्यानंतर तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला २७ जानेवारीपासून सुरुवात होईल. या मालिकेत कर्णधारपदाची जबाबदारी हार्दिक पांड्याकडे सोपविण्यात आली आहे. यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेला ९ फेब्रुवारीपासून सुरुवात होईल. या मालिकेची धुरा पुन्हा एकदा रोहितकडे असेल.

### पृथ्वी शॉचे टी-२०मध्ये पुनरागमन



मुंबईकर पृथ्वी शॉचे भारताच्या टी-२० संघात पुनरागमन झाले आहे, तर संजू सॅमसन दुखापतीमुळे वगळल्याची शक्यता आहे, कारण जितेश शर्माची यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. या संघात विराट कोहली आणि रोहित शर्माला स्थान देण्यात आलेले नाही. त्यामुळे संघाचा कर्णधार म्हणून हार्दिक पांड्या आणि उपकर्णधार सूर्यकुमार यादव जाबाबदारी बजावतील.

यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुल न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेचा भाग नाही. त्याच्या जागी केएस भरतला संधी देण्यात आली आहे. त्याचबरोबर अष्टपैलू शाहबाज अहमदलाही संघात स्थान मिळाले आहे, तर पुढील कसोटी मालिका डोळ्यासमोर ठेवून अक्षर पटेलला विश्रांती देण्यात आली आहे. शार्दुल ठाकूरचे संघात पुनरागमन झाले. रणजी ट्रॉफी गाजविणाऱ्या सरफराज खानला मात्र कसोटी संघात स्थान मिळालेले नाही.

### सूर्यकुमारला कसोटी मालिकेत संधी

ऋषभ पंत कार अपघातामुळे उपलब्ध नाही. म्हणून ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी इशान किशन आणि केएस भरत यांची निवड करण्यात आली. सूर्यकुमार यादवला पहिल्यांदाच कसोटी संघात संधी मिळाली. जयदेव उनाडकटलाही स्थान देण्यात आले आहे.

## सूर्यकुमारची फलंदाजी विव्ह रिचर्ड्सची आठवण करून देते -टॉम मूडी

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव गेल्या वर्षापासून सातत्याने शानदार कामगिरी करीत आहे. सध्या क्रीडाविश्वात त्याच्या नावाची जोरदार चर्चा आहे. अशात ऑस्ट्रेलियाच्या माजी खेळाडूने सूर्यकुमारबद्दल एक मोठे विधान केले आहे.

माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू टॉम मूडी यांनी सूर्यकुमार यादवची तुलना वेस्ट इंडिजचा दिग्गज विव्ह रिचर्ड्सशी केली. सूर्याची फलंदाजी त्याला रिचर्ड्सची आठवण करून देत असल्याचे मूडींचे म्हणणे आहे. एका मुलाखतीदरम्यान ते बोलत होते.


# अफगाणिस्तानविरुद्ध खेळण्यास ऑस्ट्रेलियाचा नकार

### तालिबानी निर्णयांच्या निषेधार्थ क्रिकेट मंडळाचे मोठे पाऊल

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळण्यास नकार दिला आहे. मार्चच्या अखेरीस यूएईमध्ये ही मालिका खेळवली जाणार होती, मात्र तालिबानच्या काही निर्णयांच्या निषेधार्थ ऑस्ट्रेलियन बोर्डाने मोठे पाऊल उचलत मालिका खेळण्यास नकार दिला आहे.

ऑस्ट्रेलियन संघाला फेब्रुवारीमध्ये भारत दौऱ्यावर चार कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळायची आहे. यानंतर यूएईमध्ये पोहचल्यानंतर अफगाणिस्तान संघाविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिकाही नियोजित होती, पण ऑस्ट्रेलियन संघ अफगाणिस्तानविरुद्ध मालिका खेळणार नाही.



अफगाणिस्तानात तालिबानची सत्ता आहे आणि त्यांनी आपल्या देशातील महिला व मुलींवर अनेक बंधने लादली आहेत. त्यांना अभ्यासासोबत घराबाहेर काम करण्याचाही अधिकार नाही. मुलींना खेळात सहभागी होण्यासही बंदी घालण्यात आली आहे. तालिबानच्या या निर्णयाच्या निषेधार्थ ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने अफगाणिस्तानसोबत क्रिकेट मालिका न खेळण्याचा निर्णय घेतला आहे.

ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले, अफगाणिस्तानसह जगभरातील महिला व पुरुषांना खेळात आणण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत तसेच त्यांच्या देशातील महिला आणि मुलींची स्थिती सुधारण्यासाठी अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाच्या सतत संपर्कात आहे. ऑस्ट्रेलियन बोर्डाने आपल्या सरकारचे समर्थन केल्याबद्दल आभार मानले आहेत.

# मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्त्विक-चिराग सेमीफायनलमध्ये



**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

भारताची तारांकित जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने पिछाडीवरून जोरदार पुनरागमन करीत मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील (सुपर ७५० दर्जा) पुरुष दुहेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. पुढच्या फेरीत त्यांचा सामना चीनच्या लिआंग वेई केंग व वांग चांग जोडीशी होईल.

सात्त्विक-चिराग जोडीने चीनच्या लियु यु चेन आणि ओयु झुआन या जोडीला १७-२१, २२-२०, २१-९ असे पराभूत केले. सामन्याच्या सुरुवातीपासून दोन्ही जोड्यांकडून आक्रमक खेळ पाहण्यास मिळाला. चीनची जोडी पहिल्या गेममध्ये वरचढ चढली. त्यांनी भारतीय जोडीची आक्रमणे परतवून लावताना गेम २१-१७ असा जिंकत आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये भारतीय जोडीने चांगला खेळ केला. तरीही चीनच्या खेळाडूंनी त्यांच्यासमोर आव्हान उपस्थित केले, मात्र सात्त्विक-चिराग जोडीने गुणांची कमाई करताना गेम २२-२० असा जिंकत सामना बरोबरीत आणला. निर्णायक गेममध्ये भारतीय जोडीने आपली हीच लय कायम राखताना चीनला पुनरागमनाची कोणतीच संधी न देता गेम २१-९ असा जिंकत सामन्यात विजय नोंदविला.

जीवेत् शरदः शतम्!
अविनाश रोनगरे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
विनायक नाईक

जीवेत् शरदः शतम्!
विठ्ठल देशमाने
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
अविनाश रोनगरे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com